नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक ४६ * * अकोला * रविवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

# स्वदेशीतून समृद्ध भारत

## स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांचा निर्धार

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. १६ :

अमेरिकेने लादलेल्या वाढीत आयात शुल्काविरोधात देश समर्थपणे उभा राहील असा निर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केला. स्वदेशीच्या मंत्रातून देश प्रगतिपथावर राहील, त्याला कोणीही रोखू शकणार नाही असे मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्लयावरून केलेल्या भाषणात अधोरेखित केले.



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाचा उल्लेख पंतप्रधानांनी टाळला असला तरी, जगभरात आर्थिक स्वार्थ वाढू लागल्याचे नमूद केले. त्यातून उद्भवणाऱ्या संकटात रडण्याचे कारण नाही. तर दाम कम, दम जादा हा मंत्र स्वीकारून भारतीय उत्पादकांनी दर्जेदार उत्पादनांनी जगाच्या बाजारपेठेत लौकिक मिळवावा, अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. तसे झाले तर कोणाचाही आर्थिक स्वार्थ भारताला त्यांच्या जाळ्यात अडकवू शकणार नाही, असे आवाहन मोदींनी देशातील लाखो लघुउद्योजकांना केले.

अमेरिकेच्या आयातकराच्या धोरणामुळे भारताला आर्थिक संकटात आणण्याचे प्रयत्न केले जात असल्याचा मुद्दाही मोदींनी भाषणामध्ये उपस्थित केला. शेतकरीविरोधी धोरण भारत सहन करणार नाही. देशातील शेतकरी, पशुपालक, मच्छीमार यांचे कधीही नुकसान होऊ देणार नाही. त्यांच्या हितासाठी भिंत बनून उभा राहीन, अशी ग्वाही मोदींनी दिली.

ऑपरेशन सिंदूरचे यश, देशांतर्गत सुरक्षेचे महत्त्व, विकसित भारताचे लक्ष्य या मुद्द्यांचा ऊहापोह त्यांनी १०३ मिनिटांच्या भाषणात केला.

सीमाभागांत घुसखोरी करून डेमोग्राफिक बदल (स्थलांतरातून लोकसंख्येच्या रचनेत बदल) केले जात आहेत. या घुसखोरीतून देशातील युवकांचे रोजगार हडपले जात आहेत. डेमोग्राफिक बदल करणारी ही घुसखोरी देशासमोरील मोठे संकट असून त्यातून सामाजिक तणाव निर्माण होतो. ही घुसखोरी सहन केली जाणार नाही. केंद्र सरकारने घुसखोरीला आळा घालण्यासाठी उच्चस्तरीय डेमोग्राफी मिशन सुरू केले असून विशिष्ट वेळेत उद्दिष्ट साध्य केले जाईल, असे मोदी म्हणाले.

# मानखुर्दमध्ये दहीहंडीला गालबोट

## पहिल्या मजल्यावरून पडून गोविंदाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

राज्यभरात मोठ्या उत्साहात सुरू असलेल्या दहीहंडी उत्सवाला मुंबईत गालबोट लागल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मानखुर्द येथे दहीहंडीचा दोर बांधत असताना एका ३२ वर्षीय गोविंदाचा पडून मृत्यू झाला. जगमोहन चौधरी असे या गोविंदाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. दुसरीकडे मुंबईतील विविध भागांतून गोविंदा जखमी झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

### मुंबईत विविध ठिकाणी ३० गोविंदा जखमी



मानखुर्दच्या महाराष्ट्र नगरमध्ये दहीहंडी उत्सवादरम्यान 'बाल गोविंदा पथक' दहीहंडी फोडण्यासाठी तयारी करत होते. त्याचवेळी जगमोहन चौधरी (वय ३२) हा गोविंदा गल्लीतल्या बालगोपाळांसाठी पहिल्या मजल्यावरून दहीहंडी बांधता होता. त्यावेळी अचानक तोल जाऊन खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने ऑटोमधून जवळच्या शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मुंबईत दुपारी तीनपर्यंत विविध ठिकाणी झालेल्या दहीहंडी कार्यक्रमांत थरावरून पडल्याने ३० गोविंदा जखमी झालेत ३० गोविंदे जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. यातील १५ जणांना उपचार करून घरी पाठवण्यात आले, तर १५ जणांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबई शहरात १८ जण जखमी झालेत. त्यापैकी १२ जणांवर उपचार सुरू आहेत. ६ जणांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आले आहे. पूर्व उपनगरात ६ गोविंदा जखमी झालेत. त्यातील तिघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर तिघांना घरी सोडण्यात आले आहे. पश्चिम उपनगरातही ६ जण जखमी झालेत. एकावर उपचार सुरू आहेत.

# पावसामुळे दरड कोसळली

## बाप-लेकीचा मृत्यू, आई-मुलगा गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

विक्रोळी पार्क साईट परिसरात शनिवारी पहाटे दरड कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. मुसळधार पावसामुळे ही दुर्घटना घडली असून, मृतांमध्ये बाप-लेकीचा समावेश आहे.

काल रात्रीपासून मुंबईत जोरदार पावसाला सुरुवात झाली असून, पूर्व उपनगरातील डोंगर उतारावरील झोपडपट्ट्यांमध्ये पावसाचा मोठा फटका बसतो आहे. विक्रोळीतील पार्क साईट परिसरात आज पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास मिश्रा कुटुंबाच्या झोपडीवर दरड कोसळली. अग्निशमन दल व पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने घटनास्थळी दाखल होत बचावकार्य सुरू केले.

दरडीत अडकलेल्या सुरेश मिश्रा (५०) आणि त्यांची मुलगी शालू मिश्रा (१९) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर त्यांच्या पत्नी आरती मिश्रा (४५) आणि मुलगा ऋतुराज मिश्रा (२०) हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुंबई महापालिकेने यंदा पावसाळ्यापूर्वी काही भाग धोकादायक म्हणून घोषित केले होते. मिश्रा कुटुंबाला घर खाली करण्याचे नोटीस देण्यात आली होती. मात्र त्यांनी घर सोडले नव्हते.

# महापालिका निवडणुकांची दहीहंडी महायुतीच फोडणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

राज्यात मागील अडीच वर्षांत मी मुख्यमंत्री म्हणून केलेले काम जनतेसमोर आहे. त्याच बळावर विधानसभेत महायुतीला ऐतिहासिक यश मिळाले. आम्ही २३२ थर लावून विधानसभेची हंडी फोडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महायुती दहीहंडी फोडणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ते आज ठाणे येथे माध्यमांशी बोलत होते.

मुंबईसह राज्यात आज दहिहंडीचा उत्साह आहे. ठाणे शहरात टेंभी नाका मित्र मंडळाच्या वतीने देखील दहीहंडी उत्सावाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला उपमुख्यमंत्री एकनाथ



### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

शिंदे यांनी दुपारी हजेरी लावली. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना उपरोक्त विश्वास व्यक्त केला.

राज्यात मागील अडीच वर्षांत मुख्यमंत्री म्हणून मी जे काम केले, ते राज्याला माहीत आहे. त्यामुळे विधानसभेला महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाला. आम्ही २३२ थर लावून विधानसभेची हंडी फोडली. आता देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली दुसरी इनिंग सुरू झालेली आहे. कामही त्याच वेगाने सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची हंडी देखील महायुतीच फोडेल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. आमचा अजेंडा विकासाचा आहे. आम्ही विकासाचे थर लावले. पाकिस्तानच्या गर्वाची हंडी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्याने फोडली, याचा आम्हाला अभिमान आहे.

# दुभाजक तोडून बस ट्रकला धडकली

## ४ जण ठार

■ वृत्तसंस्था, शिवपुरी, दि. १६ :



शनिवारी सकाळी शिवपुरी येथे ट्रक आणि प्रवासी बसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एका गायकासह ४ जणांचा मृत्यू झाला तर ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २७ वर सकाळी ५.३० वाजता हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी संध्याकाळी काशी विश्वनाथ येथे आयोजित शिवकथेच्या कार्यक्रमात सादरीकरण केल्यानंतर २० संगीतकारांचा एक गट परतत होता. गटातील सर्व सदस्य गुजरातमधील मेहसाणा आणि सुरेंद्रनगर येथील रहिवासी आहेत. शनिवारी सकाळी त्यांचा ट्रॅव्हलर सुरवाया येथून जात होती. यादरम्यान, अनियंत्रित झाली, दुभाजकावर चढली आणि दुसऱ्या लेनमध्ये गेली आणि एका ट्रकला धडकली.

पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. सुरुवातीला असे मानले जात आहे की चालकाला झोप लागल्याने हा अपघात झाला. मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी पाठवण्यात आले आहेत आणि जखमींवर उपचार सुरू आहेत.

सुर्वया पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना बाहेर काढून जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले. या अपघातात गायक हार्दिक दवे (४०) यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, राजा ठाकूर (२८), अंकित ठाकूर (२२) आणि राजपाल सोलंकी (६०) यांचाही रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

रावल मोहित, आशिष व्यास, मोहालक, नरेंद्र नायक, चेतन कुमार, ऋषिकेश, विपुल, अरविंद, अर्जुन, हर्षद गोस्वामी आणि ट्रॅव्हलरचा चालक जखमी झाले आहेत. त्यापैकी ७ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

# मुंबई मनपा लुटणाऱ्यांची हंडी फोडणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मुंबई महापालिकेला लुटणाऱ्यांची हंडी फोडणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना इशारा दिला आहे. निवडणुकीनंतर विजयाची हंडी फोडणार असल्याचा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



### देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांना इशारा

भाजप आमदार राम कदम यांच्या वतीने घाटकोपरमध्ये आयोजित दहीहंडी महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी सर्वांना दहीहंडी महोत्सवाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

या वेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर विजयाची हंडी तर आम्ही फोडणारच आहोत. मात्र ज्यांनी महानगरपालिका लुटली, त्यांच्या पापाची हंडी देखील आम्ही फोडणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही जी हंडी लावू त्यातले लोणी हे सर्व सामान्यांना मिळेल, ते कोणाच्या घरात जाणार नाही, हा प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या पापाची हंडी फोडली होती. आता मुंबईमध्ये राम कदम यांच्या माध्यमातून ऑपरेशन सिंदूरची आठवण म्हणून या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयी फडणवीस म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पाकिस्तानच्या पापाच्या हंडी भारतीय सैनिकांनी फोडली होती. त्या सैनिकांना या ठिकाणी सलाम केला जात आहे. याबद्दल राम कदम यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे.

# आजपासून महाआघाडीची मतदान अधिकार यात्रा

■ वृत्तसंस्था, सासाराम, दि. १६ :

महाआघाडीची मतदान अधिकार यात्रा १७ ऑगस्ट रोजी सासाराम येथून सुरू होणार आहे, परंतु जिल्हा प्रशासनाने सभेचे ठिकाण आणि राहुल गांधी यांच्या हेलिकॉप्टर लँडिंगला परवानगी दिलेली नाही. यावर राजद खासदार सुधाकर सिंह यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले आहेत की, 'हेलिकॉप्टरही उतरेल आणि जर सभेच्या ठिकाणी नाही तर राहुल गांधी आणि तेजस्वी यादव नक्कीच रोड मार्च करतील.' प्रशासनाच्या इच्छेमुळे महाआघाडीच्या कार्यक्रमावर कोणताही परिणाम होणार नाही.

# आग लागल्याने ४ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था,जालोर, दि. १६ :

बंगळुरूमध्ये जालोर येथील एका व्यावसायिकाचे कुटुंब जिवंत जळाले. चार मजली इमारतीच्या तळमजल्यावरील गोदामात आग लागली. काही वेळातच आग सर्व मजल्यांवर पसरली.

या अपघातात राजस्थानी व्यापारी मदन सिंह राजपुरोहित (मोदरान), त्यांची पत्नी आणि दोन मुले यांचा मृत्यू झाला. स्थानिक प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील नागरपेठ परिसरातील स्टील मार्केटमधील एका इमारतीत आग शुक्रवार-शनिवारी रात्री इमारतीला आग लागली. लोक इमारतीत अडकले. जालोरचे कुटुंब चौथ्या मजल्यावर राहत होते.

शुक्रवार-शनिवारी रात्री इमारतीला आग लागली. लोक इमारतीत अडकले. जालोरचे कुटुंब चौथ्या मजल्यावर राहत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मदन सिंग हे त्यांच्या कुटुंबासह इमारतीच्या चौथ्या मजल्यावर राहत होते. इमारतीच्या खाली त्यांचे स्टीलच्या भांड्यांचे गोदाम होते. मिळालेल्या माहितीनुसार, आग त्यांच्या गोदामात लागली. त्यानंतर ती इमारतीच्या इतर भागात पसरली. मदन यांचा गोदामात मृत्यू झाला. तर त्यांची पत्नी आणि दोन निष्पाप मुले फ्लॅटमध्येच मृत्युमुखी पडली. या इमारतीत काहींनी आगीतून इमारतीतून उडी मारून आपले प्राण वाचवले. शनिवारी सकाळपर्यंत अग्निशमन दल आणि एसडीआरएफ पथक आग विझवण्याचा प्रयत्न करत होते.

# दर्ग्याची भिंत कोसळून ६ ठार

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. १६ :

दिल्लीच्या निजामुद्दीन परिसरातील मुघल बादशाह हुमायूनच्या कबरीजवळ एका दर्ग्याची भिंत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत चार जण जखमी झाले आहेत. शुक्रवारी दुपारी ३.५५ वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली.



जखमींना एम्स रुग्णालय आणि एलएनजेपी रुग्णालयात दाखल करण्यात आले, असे सहपोलीस आयुक्त संजय कुमार जैन यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा (डीएफएस), दिल्ली पोलीस, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि दिल्ली आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (डीडीएमए) घटनास्थळी दाखल झाले. शुक्रवारच्या प्रार्थनेसाठी अनेक भाविक दर्ग्यात जमले होते. मुसळधार पावसामुळे ते दर्ग्यातच थांबले होते. एका भिंतीवर भार आल्याने ती कोसळली.




# विकसित भारताच्या जडणघडणीत महाराष्ट्र अग्रेसर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश सातत्याने प्रगती करत आहे. केवळ एका दशकामध्ये भारताने जगातल्या अकराव्या अर्थव्यवस्थेपासून चौथ्या मोठ्या अर्थव्यवस्थेपर्यंत मोठी मजल मारली आहे. आज भारताच्या संपूर्ण विकास व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र राज्य अतिशय वेगाने पुढे जात आहे. विकसित भारताच्या स्वप्नामध्ये विकसित महाराष्ट्र विशेष योगदान देत आहे. देशाची ही विकासगाथा यापुढे थांबणार नाही. पंतप्रधानांनी आत्मनिर्भर भारताचा नारा दिला आहे, हा नारा अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताला आत्मनिर्भर करण्याकरता आपल्या सर्वांना मिळून प्रयत्न करावे लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



स्वातंत्र्य दिनानिमित्त मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. या समारंभाप्रसंगी संबोधित करताना ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने भारतीय सेनेने भारताची शक्ती काय आहे, हे संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताच्या सेनेने अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सर्व आतंकवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. त्यातून भारतावरील होणारे हल्ले परतवून लावले. यामुळे जगाला देखील नवीन भारत काय आहे, हे या ऑपरेशन सिंदूरमुळे समजले आहे. म्हणून ऑपरेशन सिंदूरमध्ये ज्या-ज्या सेनेच्या अधिकाऱ्यांनी आणि सैनिकांनी सहभाग घेतला त्यांचंही अभिनंदन करतो, त्यांचे आभार मानतो असे ते म्हणाले.

भारतामध्ये थेट परदेशी गुंतवणूक येते, त्यापैकी चाळीस

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण

टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रामध्ये आली आहे. या गुंतवणुकीतून मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती राज्यामध्ये होत आहे. वस्तुनिर्माण, आयात-निर्यात, स्टार्टअप क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. ही एक मोठी विकासाची घोडदौड सुरू आहे. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांकरता मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मिळाली पाहिजे, याकरता मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत जगातला सगळ्यात मोठा डिस्ट्रीब्यूटेड सोलरचा प्रकल्प महाराष्ट्रामध्ये सुरू आहे. हा प्रकल्प २०२६ च्या डिसेंबरमध्ये पूर्ण झाल्यानंतर निश्चितपणे शेतकऱ्यांना १२ तास दिवसाची वीज मिळेल. त्यावेळी शंभर टक्के हरित वीज देणारा महाराष्ट्र हे पहिलं राज्य होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सिंचनाच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात काम चालू आहे. विशेषतः नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून वैनगंगा, नळगंगा योजना असेल, किंवा समुद्रात वाहून जाणारे पाणी हे गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणून उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याला दुष्काळमुक्त करणे, विविध नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून तापीच्या खोऱ्यामध्ये पाणी आणणे. यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतीला, उद्योगाला, पिण्याचे पाणी देण्याकरता मुबलक अशा प्रकारचे पाणी साठे तयार करणारे महाराष्ट्र एक महत्त्वाचे राज्य होणार आहे.

# कोकण नगर गोविंदा पथकाचा विश्वविक्रम

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

जोगेश्वरीच्या कोकण नगर गोविंदा पथकाने यंदा 10 मानवी मनोरे रचून जय जवान गोविंदा पथकाचा विक्रम मोडित काढला. मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडीत हा अनोखा विक्रम घडला. मंत्री सरनाईक यांनी या विक्रमावर आनंद व्यक्त करत कोकण नगर गोविंदा पथकाला सुमारे 25 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

ठाण्याला दहीहंडीची पंढीर म्हणून ओळखले जाते. तसेच मुंबईतील जोगेश्वरी येथील जय जवान गोविंदा पथक व माझगाव येथील ताडवाडी गोविंदा पथकांना त्यांच्या शिस्तबद्ध मानवी मनोरे रचण्याच्या पद्धतीमुळे ओळखले जाते. जय जवान पथकाला गोविंदा पथकांचा उपनगाराचा राजा म्हणूनही ओळखले जाते. या पथकाने तब्बल 10 मानवी मनोरे रचून विक्रम केला होता. हा विक्रम शनिवारी कोकण नगर गोविंदा पथकाने मोडीत काढला.



## प्रताप सरनाईकांकडून २५ लाखांचे बक्षीस

मंत्री प्रताप सरनाईक यांनी कोकण नगर गोविंदा पथकाला 25 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. संस्कृतीची दहीहंडी, विश्वविक्रमी दहीहंडी! संस्कृती युवा प्रतिष्ठान आयोजित "संस्कृतीची दहीहंडी, विश्वविक्रमी दहीहंडी" मध्ये कोकण नगर गोविंदा पथकाने तब्बल 10 थर लावून विश्वविक्रमाची नोंद केली. आज माझा मुलगा पुर्वेश याचे स्वप्न पूर्ण झाले. याचा मला आनंद आहे. या पथकाला 25 लाख रुपयाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले असून मानवी मनोरे रचून दिलेली ही सलामी संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे ते म्हणालेत.

ठाणे शहरातील वर्तकनगर भागात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्यावतीने दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दहीहंडीमध्ये थर रचण्यासाठी शनिवार सकाळपासूनच वेगवेगळ्या भागातील गोविंदा पथक येत होते. त्यात दुपारी जोगेश्वरीच्या कोकण नगर गोविंदा पथकाने 10 थर रचून जय जवान गोविंदा पथकाचा विक्रम मोडला. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांचा गजर करत त्यांचे अभिवादन केले. त्यानंतर सोशल मीडियावर या विक्रमाचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला.

38 वर्षीय विवेक कोचरेकर हे या कोकण नगर गोविंदा पथकाचे प्रशिक्षक आहेत. ते मागील 12 वर्षांपासून या पथकात कार्यरत आहेत. हे गोविंदा पथक या भागातील सर्वात जुन्या पथकांपैकी एक आहे. ते अतिशय शिस्तबद्धपणे मानवी मनोरे रचण्यासाठी ओळखले जाते. या पथकाने 2012 साली 7 थर लावण्यापासून सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी 8 थरांचा सराव केला. पण प्रत्यक्ष दहीहंडीत या पथकाला 7 थर लावण्यातच यश येत होते. याच कालावधीत 2015 मध्ये जय जवान, ताडवाडी व अन्य एका पथकाने 9 थर लावण्यासाठी प्रसिद्ध झाले होते. त्यात कोकण नगर गोविंदा पथकाने अचानक रस्त्यावर झोपून 9 थर लावले व माध्यमांचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करून घेतले. 2019 मध्ये या पथकाने ठाण्यात येऊन 4 वेळा 9 थर लावण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना अपयश आले. पण 2022 साली त्यांनी ठाण्यातच 9 थर लावण्याच्या विक्रमाची बरोबरी केली.

# एमएमआरमध्ये दुबईपेक्षाही मोठे, सुंदर शहर वसवू : मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :



पालघरमध्ये वाढवण बंदरालगत चौथी मुंबई तर अटल सेतूच्या पायथ्याशी तिसरी मुंबई वसविण्यात येणार आहे. ही नवीन शहरे वसविण्यासाठी विकासकांनी राज्य सरकारला सहाकार्य करावे. त्यांना आवश्यक ती मदत सरकार करेल. दोघांच्या सहकार्याने एमएमआरमध्ये येत्या १० वर्षांत दुबईपेक्षाही सुंदर असे मोठे शहर वसवून दाखवू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला. वांद्रे-कुर्ला संकुल येथील क्रेडाय-एमसीएचआय आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.

देशातील पहिले सर्वात मोठे आणि जगातील पहिल्या १० क्रमांकात मोडणारे बंदर वाढवण येथे उभारले जाणार आहे. या बंदरामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. तर या बंदरामुळे विकासाच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. या बंदराशी एमएमआरला जोडण्यासाठी उत्तन - विरार सागरी सेतूचा विस्तार विरार ते पालघर, वाढवण बंदर असा केला जाणार आहे. त्यामुळे वाढवण बंदरावर पोहचणे सोपे होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. या बंदरामुळे निर्माण होणाऱ्या संधी लक्षात घेता वाढवण बंदरालगत चौथी मुंबई वसविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून चौथी मुंबई वसवली जाणार आहे. तर दुसरीकडे अटल सेतूमुळे मुंबईतून नवी मुंबईत, तसेच नवी मुंबई विमानतळावर अवघ्या काही मिनिटांत पोहचणे शक्य होऊ लागले आहे. त्यामुळे अटल सेतू प्रभावित क्षेत्रात निर्माण होणारी संधी लक्षात घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून तिसरी मुंबई वसविण्यात येत आहे. या चौथ्या आणि तिसऱ्या मुंबईच्या माध्यमातून एक चांगले शहर वसविण्यासाठी क्रेडाय-एमसीएचआयमधील विकासकांनी सरकारला सहकार्य करावे. तिसऱ्या मुंबईसाठी तुम्ही पुढे आलात, तर एमएमआरडीए आणि विकासक यांच्या संयुक्त भागिदारीतून तिसरी मुंबई वसविणे सोपे होईल. विकासकाला २४ टक्के, तर एमएमआरडीएला ७६ टक्के हिस्सा देण्यात येईल. सरकार परवानग्या, भूसंपादनासाठी आवश्यक मदत करेल. ही संधी आहे, तुम्ही पुढे या आपण आंतरराष्ट्रीय दर्जाचे अगदी दुबईपेक्षाही सुंदर आणि मोठे शहर वसवू, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

यामुळे चौथी आणि तिसरी मुंबई आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र होणार आहे. त्याचबरोबर एमएमआरमध्ये सागरी मार्ग, सागरी सेतू, भुयारी मार्ग, मेट्रो अशा अनेक प्रकल्पांमुळेही एमएमआरमध्ये विकासाच्या संधी निर्माण होणार आहेत. जेव्हा भारताची अर्थव्यवस्था ५ लाख कोटी डॉलर्स बनविण्याचा विषय येतो तेव्हा यात महाराष्ट्राचा हिस्सा १ लाख कोटी डॉलर्स असेल असे म्हटले जाते. पण केवळ एमएमआरची क्षमता १.५ लाख कोटी डॉलर्स अर्थव्यवस्थेची आहे, असा दावा यावेळी मुख्यमंत्र्यांनी केला. नव्या विचारांने, नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण हे करू शकतो, तसा संकल्प आपण आज करू या, असेही ते म्हणाले.

# भरधाव जीपच्या धडकेमध्ये एक जण ठार

■ महासागर प्रतिनिधी
हिंगोली, दि. १६ :

हिंगोली ते परभणी मार्गावर जवळा बाजार शिवारामध्ये भरधाव कारच्या धडकेमध्ये एक जण ठार झाल्याची घटना शुक्रवारी ता 15 रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहनाने एका टीनशेडला धडक दिली. या अपघातानंतर चालकाने कार जागेवर सोडून पळ काढला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हिंगोली ते परभणी मार्गावर जवळा बाजार शिवारामध्ये शुक्रवारी रात्री नऊ वाजता गुरुकृपा एजन्सी समोर (एम एच 38 AD11 22) स्कॉर्पिओ वाहन चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने चालवले. यावेळी वाहन चालकांनी पायी जाणाऱ्या एका व्यक्तीला जोरदार धडक दिली या अपघातात सदर व्यक्ती गंभीर जखमी झाला. त्यानंतर कारचालक घाबरला. त्यामुळे त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यामध्ये त्यांनी रस्त्याच्या बाजूला असलेल्या



एका टीन पत्राच्या शेडला धडक दिली. यामध्ये शेडचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अपघातानंतर चालकाने घटना स्थळावरून पळ काढला.

जवळाबाजार पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भगत, जमादार इम्रान सिद्दिकी व दिलीप नाईक यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी जखमीला तातडीने उपचारासाठी जवळाबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर सदर व्यक्तीचा मृत्यू झाल्याची जाहीर केले.

दरम्यान या अपघातातील मयत व्यक्तीचे नाव भगवान जांबुदे (३५ रा असोला तर्फे औंढा) असे असल्याचे पोलिसांनी सांगितले. भगवान हे जवळाबाजार येथे शिलाई काम करत होते.

रात्रीच्या वेळी काम आटोपून ते पायी असोला फाटा कडे निघाले असताना हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले. सदरील वाहन जवळाबाजार येथील असल्याचेही पोलिसांनी सांगितले असून चालकाचा शोध सुरू करण्यात आला आहे याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

# कागदपत्रे नाहीत? मग पगारही नाही!

## वेतन अधीक्षकांचा शिक्षकांना अल्टिमेटम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सावधान! शासनाने १८ नोव्हेंबर २०१२ ते ७ जुलै २०२५ या काळातील सर्व शैक्षणिक पात्रता आणि नोकरीनंतरची आवश्यक कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करणे बंधनकारक केले आहे. ऑगस्टचे पगारबिल सादर करताना ती ऑनलाइन अपलोड केल्याची प्रत मुख्याध्यापकांकडून जोडलीच पाहिजे.

शालार्थ आयडी आणि बनावट मान्यता घेऊन शासनाचा पगार उकळणाऱ्यांचा पदार्फाश करण्यासाठी जिल्हा परिषद व खासगी अनुदानित शाळांतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे ३० ऑगस्टपर्यंत अपलोड करण्याची सक्त मुदत ठरवण्यात आली आहे. नागपुरात आधीच अनेक बनावट आयडीधारक उघडकीस आले आहेत. पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखालील तिन सदस्यीय समिती ही कागदपत्रे तपासणार. शालार्थ प्रणालीवरून अपलोड झालेली माहिती आणि शिक्षणाधिकाऱ्यांकडील मूळ कागदपत्रे तंतोतंत जुळतात का, याची काटेकोर छाननी होईल. वैयक्तिक मान्यता, नियुक्ती आदेश, शालार्थ आयडी, रूजू अहवाल इत्यादी कागदपत्रे अपलोड करण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांवर टाकण्यात आली आहे. वेतन अधीक्षकांनी स्पष्ट शब्दांत आदेश दिला आहे - "मुदतीत कागदपत्रे अपलोड न करणाऱ्यांचा पगार रोखला जाईल!"

# कानगाव शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
कानगाव, दि. १६ :

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानगाव (तालुका दौंड) या शाळेत भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून राजेंद्र गवळी (संचालक भीमा पाटस सहकारी साखर कारखाना पाटस) हे उपस्थित होते. प्रथम ध्वज पूजन निलेश गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहण शालेय शिक्षण समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी समूहगीत व देशभक्तीपर गीते सादर केली.



यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मनोगतांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या मनोगतानंतर मान्यवरांची मनोगते झाली.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिन तसेच भविष्यातील नियोजन याविषयी मार्गदर्शन केले तसेच शाळेत चालू असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. मंथन स्पर्धा परीक्षा तसेच विविध गुणदर्शन स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कानगाव ग्रामपंचायत तसेच दौंड तालुका पोलिस मित्र समितीकडून विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण कोऱ्हाळे, उपाध्यक्ष योगेश चौधरी तसेच सर्व सदस्य उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक सखाराम खोमणे, उपशिक्षक राजेंद्र जगताप, श्याम ठाणेदार, एकनाथ हराळ, प्रकाश लकडे , संध्या कुंभार, शोभा कोष्टी यांनी स्वातंत्र्य दिनाचे नियोजन अतिशय उत्तम रित्या केले होते.

# ५१ नवी ई-बसेस धूळ खात आगारात

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १६ :

मुंबईकर आधीच बसथांब्यांवर ताटकळत आहेत, तिथे बेस्टचा ताफा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यात नव्याने आलेल्या ५१ इलेक्ट्रिक एसी बस प्रवाशांना सेवा देण्याऐवजी ओशिवरा आगारातच उभ्या आहेत - कारण तिथे चार्जिंग पॉइंटच नाही!

सध्या बेस्टकडे फक्त २,६८७ बस आहेत, त्यापैकी ४१८ स्वतःच्या मालकीच्या. ताफा तीन हजारांच्या खाली आल्याने प्रवाशांची प्रतिक्षा वाढली आहे. रस्त्यावरील कामांमुळे अनेक मार्ग रद्द किंवा बदलले गेले आहेत. प्रवाशांना बसऐवजी पयार्यी वाहतूक शोधावी लागत आहे.

२०२३ मध्ये ओलेक्ट्रा ग्रीनटेकला २,१०० ई-बस पुरवण्याचे कंत्राट दिले, पण आजवर फक्त ६५० बस आल्या. फोटॉन कंपनीकडून येणाऱ्या २५० बसांपैकी ५१ आधीच ओशिवरा आगारात उभ्या, मात्र चार्जिंग स्टेशन नसल्याने एकही रस्त्यावर उतरलेली नाही. चार्जिंग पॉइंटसाठी पावसाळ्यात खोदकाम हवे, पण मुंबई महापालिका परवानगीच देत नाही. इलेक्ट्रिक बसेस घेतल्या पण चार्जिंग स्टेशन विसरले - हा नेमका कोणाचा कारभार? पावसाळ्यात जेव्हा बेस्टचा सहारा मुंबईकरांना सर्वाधिक हवा, तेव्हा नवी कोरी बसेस धूळ खात पडलेल्या. प्रवाशांना त्रास देणाऱ्या आणि कोट्यवधींचा निधी वाया घालवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी आता जोर धरते आहे.

# मंत्रालयाबाहेर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १६ :

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी मंत्रालयाच्या बाहेर नाशिकच्या अंबड येथून आलेल्या आंदोलकांनी धडकी भरवणारी कृती करत पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे अनिष्ट प्रसंग टळला.

अतिक्रमणाच्या विरोधात आंदोलकांनी आज मंत्रालय गाठले. नाशिक महानगरपालिकेच्या जागांवर काही कंपन्यांनी बेकायदेशीर कब्जा केल्याचा आरोप करत त्यांनी ही टोकाची भूमिका घेतली. वारंवार तक्रारी देऊनही कारवाई होत नसल्याने आंदोलकांचा संताप शिगेला पोहोचला होता. पुरुष आंदोलकांनी यावेळी कॅनमधील पेट्रोल अंगावर ओतून पेटवण्याचा प्रयत्न केला. त्याच क्षणी पोलिसांनी पुढे झेपावत त्यांना रोखले आणि ताब्यात घेतले. आंदोलनात स्त्री-पुरुष दोघांचाही सहभाग होता. दरम्यान, मंत्रालयाच्या दाराशी कारवाई करा, अतिक्रमण हटवा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या प्रकारानंतर मंत्रालयाबाहेर काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# यूट्यूबवरून शिकून बनावट नोटा छापण्याचा कारखाना टाकला



## इचलकरंजीत पोलिसांच्या तिघांना बेड्या

■ महासागर प्रतिनिधी,
इचलकरंजी, दि. १६ :

इचलकरंजी-तील मंगळवार पेठ परिसरात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकून बनावट नोटा छापण्याचा कारखाना उद्ध्वस्त केला आहे. या कारवाईतून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी यूट्यूबवरील व्हिडिओ पाहून बनावट नोटा छापण्याचे कौशल्य आत्मसात केले होते. या माध्यमातून त्यांनी आधुनिक प्रिंटिंग मशिन, स्कॅनर आणि संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च दर्जाच्या बनावट नोटा छापण्याचा प्रयत्न केला होता.

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत उघड झाले की, आरोपींनी गेल्या काही महिन्यांपासून या व्यवसायाला सुरुवात केली होती.

इंटरनेटवरील व्हिडिओमधून मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी यंत्रसामग्री खरेदी करून घरातच नोटा छापण्याची प्रक्रिया सुरू केली. या कारवाईत लाखोंच्या किमतीच्या बनावट नोटा, कागद, शाई आणि यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे.

बनावट नोटा छापून त्या बाजारात पुरवण्याचा त्यांचा डाव होता, मात्र LCB पथकाने वेळेत कारवाई करून हा कट उधळला.

# एसीच्या स्फोटात विवाहितेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
सोलापूर, दि. १६ :

घरातील एसीचा स्फोट होऊन 40 वर्षीय विवाहितेचा बळी गेल्याची मन हेलावून टाकणारी घटना सोलापूर शहरातील जुन्या विडी घरकुल परिसरात घडली. एसीमध्ये स्फोट झाल्यामुळे ही दुर्घटना घडल्याची माहिती आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, पल्लवी प्रवीण सग्गम असे मृत महिलेचे नाव आहे. त्या आपल्या घरात बसल्या होत्या. त्यावेळी अचानक त्यांच्या घरातील एसीचा स्फोट झाला. स्फोटानंतर काही कळायच्या शॉर्टसर्किट झाले. त्यानंतर संपूर्ण घराला आग लागली. ही आग एवढी भयंकर होती की, पल्लवी यांना घराबाहेरही पडता आले नाही. घराला आग लागल्याचे लक्षात येताच शेजारच्या लोकांनी आरडाओरडा सुरू केला.

# गोपीचंद पडळकर म्हणजे बेन्टेक्सचे सोने

## रोहित पवार यांचा नाव न घेता घणाघात

■ महासागर प्रतिनिधी,
सांगली, दि. १६ :

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शनिवारी मंत्री चंद्रकांत पाटील यांचे कौतुक करत भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर निशाणा साधला. चंद्रकांत पाटील हे भाजपचे खरे सोने आहेत. या खऱ्या सोन्याने सांगलीच्या बेन्टेक्सच्या सोन्याचे काय करायचे हे ठरवावे, असे ते म्हणालेत. उपमुख्यमंत्री अजित पवार गावकीच्या नादात भावकीचा विचार विसरल्याचेही ते यावेळी म्हणाले.

इस्लामपूर स्थित महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. एन डी पाटील विधी महाविद्यालय, सरोज नारायण पाटील (माई) मानसशास्त्र संशोधन केंद्र व प्रा. डॉ. एन डी



पाटील बहुदेशीय सभागृहाचा आज सकाळी उद्घाटन सोहळा झाला. यावेळी बोलताना रोहित पवार यांनी गोपीचंद पडळकर यांचा समाचार घेतला. ते म्हणाले, सांगली जिल्ह्यात संस्कृतीला फार महत्त्व दिले जाते. येथे चंद्रकांत पाटीलही आहेत. ते भाजपचे नेते असले तरी ते त्या पक्षाचे खऱ्या अर्थाने सोने आहेत. आम्ही त्यांना जेव्हा केव्हा भेटतो तेव्हा ते आमचे ऐकूण घेतात. एखाद्या मुलाचा किंवा विद्यार्थ्याचा प्रश्न असेल तर लगेच फोन लावतात. ही त्यांची स्टाईल आम्हाला आवडते. चंद्रकांत पाटील राजकारणाच्या जागी राजकारण व समाजकारणाच्या जागी समाजकारण करतात. ते खरे सोने आहेत. पण सध्या काही बेन्टेक्सचे लोक या जिल्ह्यात फिरत आहेत. ते खालच्या पातळीवर जाऊन काही मोठ्या नेत्यांवर टीका करत आहेत. त्यामुळे या बेन्टेक्सच्या सोन्याचे काय करायचे हे भाजपच्या खऱ्या सोन्याने लक्षात घेतले पाहिजे. रोहित पवार यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही टोला हाणला.

# लाडकी बहीण योजनेची फेरपडताळणी सुरू

## पात्र लाभार्थी महिलांवर अन्याय होणार नाही : अदिती तटकरे

■ महासागर प्रतिनिधी
अलिबाग, दि. १६ :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या फेर पडताळणीवरून राज्यात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. पण राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी ही फेरपडताळणी सुरू असली तरी पात्र लाभार्थी महिलांवर कोणताही अन्याय होणार नसल्याची ग्वाही दिली आहे.

मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सरकारला मिळालेला डेटा हा प्राथमिक स्वरुपाचा आहे. या योजनेला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यावेळी या योजनेंतर्गत 2 कोटी 63 लाख लाख महिलांची नोंदणी झाली होती. प्राथमिक पडताळणीत 10 ते 15 लाख अर्जदार अपात्र ठरले होते. त्यानंतर आम्ही वेगवेगळ्या विभागांकडून



त्यांच्याकडील लाभार्थ्यांची माहिती मागवली. माहिती तंत्रज्ञान विभागाने आम्हाला सर्व विभागाच्या 26 लाख लाभार्थींची माहिती दिली. त्यात काही लाभार्थी महिलांना अन्य योजनांचा लाभ मिळत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार काही महिला पहिल्याच पडताळणीत बाद ठरल्या.

पत्रकारांनी यावेळी अंगणवाडी सेविकांनी गावातील संबंध बिघडण्याच्या भीतीने पडताळणीचे काम करण्यास असमर्थता दर्शवल्याविषयी प्रश्न केला. त्यावर अदिती तटकरे म्हणाल्या, सरकार प्रस्तुत महिला गरजू महिलांसाठी राबवत आहे. शासकीय सेवेत असतानाही या योजनेचा लाभ घेतला जात असेल तर शासन त्याविषयी योग्य तो निर्णय घेईल. या प्रकरणी कुणालाही चुकीचा लाभ मिळू नये यासाठी सरकार योग्य ती पाऊले उचलत आहे. त्यामुळे सर्वांनी अंगणवाडी सेविकांना पडताळणीसाठी सहकार्य करावे.

सरकार जनतेला वेगवेगळ्या शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी कटिबद्ध आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ एखादी महिला घेत असेल तर तिला अपात्र ठरवले असेल, तर कदाचित त्या महिला दुसऱ्या एखाद्या योजनेचा लाभ मिळत असेल किंवा अधिकच्या उत्पन्नामुळे ती निकषात बसत नसेल. पण चुकीच्या पद्धतीने कुणालाही या योजनेचा लाभ मिळता कामा नये, असे अदिती तटकरे यांनी या प्रकरणी स्पष्ट केले.

# मुंबईतील वृद्ध महिलेला १८ लाख रुपयांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

मुंबईतील एका ७१ वर्षीय महिलेने ऑनलाइन एक लिटर दूध ऑर्डर करण्याचा प्रयत्न करताना तिच्या बँक खात्यातून १८.५ लाख रुपये डिबेट झाले. खरंतर, वडाळा येथील महिलेने ऑनलाइन डिलिव्हरी अॅपवरून दूध ऑर्डर करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दोन दिवसांत तिची संपूर्ण बचत गायब झाली. महिलेला हे कळताच तिने पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी सांगितले की, ही घटना ४ ऑगस्ट रोजी घडली. महिलेला एका व्यक्तीचा फोन आला ज्याने स्वतःची ओळख दीपक म्हणून करून दिली, जो एका दूध कंपनीचा अधिकारी आहे. फसवणूक करणा?या व्यक्तीने महिलेच्या मोबाईल नंबरवर एक लिंक पाठवली आणि दूध ऑर्डर करण्यासाठी माहिती मागितली.

फसवणूक करणाऱ्याने महिलेला लिंकवर क्लिक करण्यास आणि कॉल डिस्कनेक्ट न करता सूचनांचे पालन करण्यास सांगितले. कॉल एका तासापेक्षा जास्त काळ चालू राहिल्याने महिलेला कंटाळा आला आणि तिने कॉल डिस्कनेक्ट केला. पण दुसऱ्या दिवशी महिलेला पुन्हा फसवणूक करणाऱ्याचा फोन आला.

जेव्हा ती महिला बँकेत गेली तेव्हा तिला आढळले की तिच्या एका खात्यातून १.७ लाख रुपये काढले गेले आहेत. अधिक तपास केल्यावर असे आढळून आले की तिची आणखी दोन बँक खाती देखील रिकामी झाली आहेत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तक्रारदार महिलेला तिन्ही बँक खाती रिकामी झाल्यामुळे १८.५ लाख रुपयांचे नुकसान झाले.

# गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा

## भजनी मंडळांना ५ कोटींचे अनुदान, उत्कृष्ट मंडळांसाठी १.५० कोटींची बक्षिसे!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला नवा उंचाव देणारा ऐतिहासिक निर्णय – गणेशोत्सवाला राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा शासन निर्णय जाहीर झाला आहे. पर्यटन आणि उद्योगाला चालना देतानाच परंपरेला बळ देणाऱ्या या उपक्रमामुळे, यावर्षीचा गणेशोत्सव अधिकच भव्य-दिव्य होणार आहे.

शासनाने राज्यातील नोंदणीकृत भजनी मंडळांना भांडवली खचार्साठी तब्बल ५ कोटी रुपयांचे अनुदान जाहीर केले. तर तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना १.५० कोटी रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत.

या संपूर्ण उपक्रमाचा समन्वय पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या हाती देण्यात



आला असून, जिल्हाधिकारी कार्यालये व पर्यटन-सांस्कृतिक कार्य विभाग यांची यामध्ये महत्वपूर्ण भूमिका असेल.

पारंपरिक भक्ति आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधत, यंदा गणेशोत्सवात अध्यात्म नाट्यरंग महोत्सव, राज्य व्याख्यानमाला, भव्य ड्रोन शो, आणि गणपती रील्स स्पर्धा होणार आहेत. तसेच, गणेश मंदिरांचे ऑनलाइन दर्शन आणि घरगुती गणेशोत्सवाचे फोटो अपलोड करण्यासाठी खास डिजिटल प्लॅटफॉर्म तयार होणार आहे. लोकमान्य टिळकांनी जनजागृतीसाठी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आज जागतिक सांस्कृतिक ओळख बनला आहे.

आता शासनाच्या या निर्णयामुळे, गणेशोत्सव केवळ उत्सव नाही - तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक सामर्थ्याचा आणि एकात्मतेचा भव्य महोत्सव ठरणार आहे.



# जिल्ह्यात स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष; गावागावांत निघाली रॅली



## राज्याची समग्र व सर्वसमावेशक विकासाकडे वाटचाल :ॲड. आकाश फुंडकर



**अकोला :'विकसित भारत २०४७' व 'विकसित महाराष्ट्र'चे उद्दिष्ट म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नव्हे, तर समग्र व सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन आहे. हा संकल्प अधिक दृढ व त्यानुसार कार्यशील होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने राज्य शासनाची वाटचाल होत आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, महापालिका आयुक्त सुनील लहाने यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, सैनिकांचे कुटुंबिय व अनेक मान्यवर उपस्थित होतेपालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पाच्या व्यापक दृष्टीशी जोडून महाराष्ट्राला २०४७ पर्यंत आत्मनिर्भर, समृद्ध, तंत्रज्ञान–समर्थ, सामाजिकदृष्ट्या समतोल आणि पर्यावरणपूरक राज्य बनविण्याचा निश्चय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने केला आहे. या दीर्घकालीन उद्दिष्टांचा वेध शासनाच्या अनेक नवनव्या निर्णयांतून दिसून येईल.**

ते पुढे म्हणाले की, शेतीच्या उत्पादनक्षमतेत आणि शेतक–यांच्या उत्पन्नात वाढ आणि शाश्वत कृषी विकास घडवून आणणे हे विकसित महाराष्ट्र २०४७च्या वाटचालीतील महत्वाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी पीक विविधीकरण, कृषी प्रक्रिया उद्योगांची वाढ, थेट विक्री साखळी, पीक विमा योजनांत सहभाग वाढवणे व नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तत्काळ नुकसान भरपाई असे प्रयत्न होत आहेत.

गत खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीने बाधित ७१ हजार ४३२ शेतक–यांना ९९ कोटी ६ लक्ष रू. डीबीटी पद्धतीने वितरित करण्यात आले. प्रधानमंत्री पिक विमा योजनेत खरीप हंगाम २०२४ मध्ये २ लक्ष ६४ हजार ८८५ लाभार्थ्यांना ८० कोटी ९ लक्ष रूपये, तसेच रब्बी हंगामात १ हजार ४१६ लाभार्थ्यांना २ कोटी २२ लक्ष रूपये भरपाई देण्यात आली. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात विविध बाबींसाठी २ कोटी २२ लक्ष रू. अनुदान वितरणाचे उद्दिष्ट आहे. 'मनरेगा'मध्ये यंदा १२०० हे. क्षेत्रावर व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत १ हजार हे. क्षेत्रावर फळबाग लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

ते पुढे म्हणाले की, एक जिल्हा, एक उत्पादन केंद्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाल्याने 'अकोला कापूस' या ब्रँडची देशपातळीवर ओळख निर्माण होत आहे. पायाभूत सुविधांसाठी मोठा निधी शासनाने दिला असून, जिल्ह्यात रस्ते व पुलांसाठी ३१५ रूपये कोटी निधीतून १३४ कामे पूर्ण झाली.

तसेच, ३५ महत्वाच्या इमारतींसाठी ४६९ कोटी रूपये निधी मंजूर केला. अनेक म हत्वपूर्ण इमारतींच्या निर्मिती झाली असून, प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी काम गारभवन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी १६ कोटी ६१ लक्ष ९२० रू. निधीला मान्यता देण्यात आली आहे.

अकोल्यातील वैद्यक क्षेत्राच्या विकासाच्या शक्यता लक्षात घेऊन येथे 'वनस्टॉप ऑल केअर हब' म्हणून विकास करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकीकरण हाती घेतले आहे. त्यासाठी ११.७८ कोटी रू. निधीही उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

'विकसित महाराष्ट्र २०४७'मध्ये पर्यटन क्षेत्रही मोलाची भूमिका बजावणार आहे.त्यादृष्टीने जिल्ह्यात नरनाळा किल्ला व काटेपूर्णा अभयारण्य येथे विविध सुविधा निर्माण होत आहेत. जलद तक्रार निवारण आणि प्रभावी फाइल निकाली काढण्यासाठी सर्व पोलिस ठाण्यांमध्ये सेवा प्रणाली आणि ई कार्यालय सुरू करण्यात आले आहे.महसूल विभागाच्या सर्व कार्यालयांत ई– ऑफिस कार्यान्वित केले.

# काळानुरूप तंत्रज्ञातील बदल स्विकारा, प्रत्येकांचे योगदान महत्वाचे : मुख्य अभियंता,राजेश नाईक

### विद्युत भवनात ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अकोला :** ऊर्जा ही विकासाची जननी आहे,त्यामुळे महावितरणचे कर्मचारी म्हणून प्रत्येकांनी दिलेले योगदानाचा राष्ट्रविकासात वाटा आहे,तथापि काळानुसार विकासाचे तंत्रज्ञान बदलत आहे आणि बदलत्या तंत्रज्ञानुसार प्रत्येकांनी बदल आत्मसात केले पाहिजे असे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले. स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त ते बोलत होते.



विद्युत भवन येथे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी अधीक्षक अभियंते प्रतिक्षा शंभरकर,दिपक सोनोने,,कार्यकारी अभियंता लिना नागपूरे,धीरज चव्हाण,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरून शेलकर,व्यवस्थापक राजेश डोणगावकर यांच्यासह अधिकारी,अभियंते व कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मुख्य अभियंता म्हणाले की,अनेक नामांकित कंपन्या,ब्रँड्स यांनी बदलत्या काळानूसार बदल केले नसल्याने त्या नामशेष झाल्या आहेत, महावितरणच्या दारातही स्पर्धा उभी आहे, त्यामुळे ग्राहक केंद्री सेवा देणे हीच म हावितरणच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांची प्राथमिकता असली पाहिजे,एवढेच नाही तर परिमंडळात राबविण्यात येत असलेल्या विविध प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना,मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना,मागेल त्याला सौर कृषीपंप,आणि आरडीएसएस आदी योजनां मुळे परिमंडळातील वीज यंत्रणा बळकट होणार असल्याने याचा लाभ हा ग्राहकांना होणार आहे.

# आत्मनिर्भर देशनिर्मितीत कृषिची मध्यवर्ती भूमिका : कुलगुरू

**अकोला** : कृषि प्रधान संस्कृती लाभलेल्या सर्वाधिक युवकांच्या आपल्या देशाची वाटचाल सार्वभौमांसह आत्मनिर्भरतेकडे होतं असून आर्थिक संपन्न राष्ट्रनिर्मितीत कृषि क्षेत्राचीच मध्यवर्ती भूमिका असल्याचे व पर्यायाने शेतकरी आणि शेती संबंधित कार्य करणाऱ्या संस्थानी एकात्मिक पद्धतीने एकत्रित प्रयत्नांची मोट बांधण्याची गरज डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी प्रतिपादित केली.



भारतीय स्वातंत्र दिनाच्या वर्धापन दिनी अकोला येथील मुख्यालयी आयोजित ङ्गस्वातंत्र्य दिन समारंभातङ्क उपस्थित अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी वर्गाला संबोधित करतांना ते बोलत होते. आपला भारत देश गांव –खेड्यांचा बनला असून देशांतर्गत सर्वाधिक लोकसंख्या आजही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे व देशातील जनतेसाठी सकस अन्न–धान्य, फळे, भाजीपाला दूध–दुभते निर्माण करण्याचे अतुलनीय कार्य ग्रामीण भागातील शेतकरी बंधू– भगिनी करीत असल्याचे गौरवोद्गार काढीत देश सर्वार्थाने विकसित होण्यासाठी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी गाव खेड्यांचा शाश्वत विकास हि प्राथमिकता असून कृषी–अकृषी विद्यापीठा सह सर्व शासकीय– निम शासकीय विभाग, सहकारी– सेवाभावी–खाजगी संस्थानी एकत्र येत गावांच्या गरजा लक्षात घेऊन सामुहिक पद्धतीने नियोजन केल्यास गांव आणि पर्यायाने राष्ट्र अधिक प्रगत होईल.

असे आवर्जून सांगताना कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी उन्नत भारत अभियाना अंतर्गत 'मॉडेल व्हिलेज' संकल्पना विदर्भातील ग्रामस्थानी स्वीकारली असून या उपक्रमाचे प्रभावी अंमलबजावणीतुन गावांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठाचे प्रयत्नांना प्रतिसाद लाभत असल्याचे सांगितले. तथापि या उपक्रमात प्रत्येक युवक –युवतींचा सक्रिय सहभाग अपेक्षित असून प्रत्येक कुटुंब खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होण्यासाठी काळसुसंगत कौशल्य आत्मसात करित व्यावसायिक तत्ववार आधुनिक शेती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने स्वतःचा, कुटुंबाचा, गावाचा आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास साध्य होईल असे सांगताना या सर्व उपक्रमात विद्यापीठ आपले सोबतच राहील.

**(उर्वरीच बातम्या ६ वर)**

# अकोला जिल्ह्यात ढगफुटी : शेतीपिकांचे अतोनात नुकसान लोकांच्या घरात घुसले पाणी

**आज दुपारनंतर अचानक ढग फुटी सदृश्य अतिवृष्टी होउन पळसो, रामगाव, कौलखेड, गोदापूर, बोरगाव, रामगाव ,दहिगाव परीसरातील पंचक्रोशीत प्रचंड अतिवृष्टी झाली , पिकांचे अतोनात नुकसान होउन जमिनी व पिके वाहून पाण्याखाली गेली, नदी नाले पुरामुळे दुथडी वाहून गावात पाणी घुसून नागरी वस्तीचे नुकसान झाले आमदार रणधीर सावरकर तातडीने प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी पोहोचले, झालेल्या नुकसानी बाबत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, कृषी अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यकांना तातडीने नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून आर्थिक नुकसानीचा सर्वे करून शासनाला तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना आमदार रणधीर सावरकर यांनी दिल्या आहेत.**

**▪अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :**
अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर अकोट तेलारा तालुक्यात ढगफुटी सदस्य मुसळधार पाऊस झाल्याने शेती पिकाची अतोनात नुकसान झाले असून लोकांच्या शेतातून माती सुद्धा वाहून गेली नदी नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला असून संपूर्ण शेती सध्या पाण्याखाली आहे शेतांमध्ये टोंगळ्या टोंगळ्या पाणी असून गावांमध्ये सुद्धा पाणी घुसले कित्येक लोकांच्या घरामध्ये पाणी घुसले असून लोकांचे अतोनात नुकसान झाले आहे दुपारी तीन वाजता पासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली तो पाऊस संध्याकाळी सात वाजेपर्यंत सतत सुरूच होता या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून शेतांमध्ये पाणीच पाणी साचले असून सर्वत्र तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहेत कित्येक शेतांमधली माती सुद्धा खरडून गेलेली आहे तर नदी नाल्यांना पूर आला असून कित्येक गावांमध्ये पाणी घुसले शहरांमधील खोलगट भागामध्ये सुद्धा पाणी घुसले असून कित्येकांच्या घरांमध्ये दुकानांमध्ये पाणी घुसल्याने अतोनात नुकसान झाले आहे शेतकरी यावर्षी आधीच पाऊस नसल्याने हवालदिल झालेला आहे काही लोकांनी दुबार तिबार पेरण्या केल्या व आता कुठे पिकत थोडी बोलायला लागली होती तोच आज झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकरी पुरता बरबाद झाला आहे तसेच शहरात सुद्धा सतत धार पाऊस बरसल्याने खोलगट भागातील दुकाने घरांमध्ये पाणी गेल्याने लोकांच्या तोंडात नुकसान झाले आहेत महापालिकेने नालेसफाई केली नसल्याने लोकांना सामोरे जावे लागले आहे





### वादळीवाऱ्यासह पावसाची दमदार हजेरी; वृक्ष कोलमडली, अनेक गावं अंधारात

**तेल्हारा** : गत दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असलेल्या तेल्हारा तालुक्यातील ,खापरखेड ,भांबेरी, मनब्दा, दहिगाव सह परीसरातील गावांमध्ये आज, शनिवारी सायंकाळी वादळीवाऱ्यासह जलधारा बरसल्या. वादळी पावसाचे हे आगमन आक्रमक असले, अचानक आलेल्या या संकटामुळे तासाभरासाठी जनजीवन ठप्प झाले होते. शनिवार दिनांक१६ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी जोराचा वारा पाऊस सुरू झाला. विजांचा कडकडाट, प्रकाशाचा लखलखाट पाऊसधारा असा हा संगम सुमारे अर्धातास सुरू होता. या वादळी पावसामुळे खापरखेड सह काही भागांत वृक्ष कोलमडली. त्यात काही घरांची पडझड झाली अनेकांच्या घरांवरील टिन पत्रे उडाली.





# लाखपूरी सर्कल परिसरात ढगफुटी सदृश पाऊस

## गावागावात पाणीच पाणी, शेतकऱ्यांचा आक्रोश उसळला

**▪मुर्तिजापुर,दि १६ (प्रतिनिधी) :**
तालुक्यात शनिवारी दुपारी अवकाळी कोसळलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला. लाखपूरी सर्कल परिसरात ढग फुटी सदृश परिस्थिती निर्माण झाली. यंदाचा हा सर्वात मोठा व तडाखेबाज पाऊस ठरला असून, यापूर्वी एवढा प्रचंड पाऊस कधीच झाला नव्हता. शेतशिवारात पाण्याचे प्रचंड लोट घुसून लाखो रुपयांच्या पिकांचे नुकसान झाले. गावागावात पाणी घरात व अंगणात शिरल्याने जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे.या पावसाचा थेट फटका लाखपूरी, दुर्गवाडा, दातवी, मंगरूळ कांबे, जांभा खुर्द, जांभा बु., उम्ई, जितापूर नाकट, रसलपूर, शेलूनजीक, दताळा भटोरी, कसारखेड, मोहखेड या गावांना बसला. शेतकरी वर्ग अक्षरशः हवालदिल झाला असून सोयाबीन, कापूस, मका यांसारख्या पिकांचे शेकडो एकर पाण्याखाली गेले. काही ठिकाणी जनावरांचे गोठे पाण्यात बुडाले, घरगुती वस्तू वाहून गेल्या. रस्त्यांवरून नद्या वाहू लागल्याने तालुक्यातील अनेक गावे संपर्कविहीन झाली. शेतशिवारातून बाहेर पडायला नागरिकांना मार्गच उरलेला नाही. रस्ते बंद, वाहतूक ठप्प, शेती व जनजीवन पूर्णतः कोलमडलेले – अशी दयनीय परिस्थिती आहे. संतप्त नागरिकांनी ङ्गआमच्या डोळ्यासमोर आमचे श्रमाचे पीक बुडताना शासनाचे प्रतिनिधी कुठे आहेत?ङ्क असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. शासन व प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्तांना मदत द्यावी, अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा ग्रामस्थ देत आहेत. अवकाळी पावसाने उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या आक्रोशाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले, तर तालुक्यातील असंतोषाचे वादळ अधिक भडकणार हे स्पष्ट झाले आहे.

# जनादेश चोरी ही मतांची चोरी नाही का?

सोमवार (दि. १२) हा दिवस 'दिल्ली ते मुंबई' च्या राजकारणात देशभर चर्चेचा विषय ठरला. अर्थात, जनकल्याणाच्या एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी नव्हे तर, संधीसाधू आणि स्वस्वार्थी कारभा-यांनी घातलेल्या 'धुडगुसा'मुळे. दिल्लीत राहुलबाबाच्या नेतृत्वात(?) 'मतचोरी'विरुद्ध निवडणूक आयोगाच्या विरोधात 'इंडिया' आघाडीचा मोर्चा निघाला. तर, राज्यात विविध शहरांत 'मविआ'च्यावतीने सत्ताधारी पक्षांतील कलंकित मंत्र्यांनी राजिनामे द्यावेत, या मागणीसाठी उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वात 'जनआक्रोश' आंदोलन पार पडले. २ दिवसांपूर्वी उध्दव ठाकरे यांचा राहुल गांधी यांनी दिल्लीत केलेला अपमान ( नंतर त्यांच्या नोकराने त्यावर थातूरमातूर स्पष्टीकरण दिले, हा भाग अलहिदा) त्यांच्या चांगलाच जिव्हारी लागल्याने, अजून 'इज्जतीचे खोबरे' होऊ नये, म्हणून त्यांनी मुंबईत 'जनआक्रोश' आंदोलन करण्यात धन्यता मानली असावी. याप्रसंगी त्यांनी आंदोलकांना जे संबोधन केले, त्यावरून त्यांचे हे 'जनआक्रोश' नव्हे तर, 'मनआक्रोश' आंदोलन होते, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कारण, त्यांनी, नित्यनियमाप्रमाणे आपल्या मनातील फडणवीस आणि भाजपविषयीची मळमळ ओकली. ते म्हणाले की, 'आज महाराष्ट्र जागा झाला आहे'. पण, ते हे विसरले की, जेव्हा त्यांनी स्वतःच्या आणि राजपुत्राच्या स्वार्थासाठी जनादेशाच्या मतांवर 'महादरोडा' टाकला, तेव्हाच महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणूस जागा झाला होता. म्हणूनच त्याने त्यांना विधानसभा निवडणुकीत 'धोबीपछाड' देत कायमचे घरी बसवले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्वतः जनादेशाच्या मतांवर दरोडा टाकणारा स्वार्थी मामु (माजी मुख्यमंत्री) कोणत्या तोंडाने सत्ताधारी पक्षांतील मंत्र्यांचे राजिनामे मागतो? हेच समजत नाही. तो अधिकार आणि तेवढी नैतिकता आपल्यात, आपल्या राजपूत्रात आणि महिलांना अश्लील शिविगाळ करणा-या आपल्या 'थापाड्या' नोकरात आहे का? हे एकदा आरशात बघून, आपण मुख्यमंत्री कसे झालो? याचे आत्मपरीक्षण केले असते तर बरे झाले असते.

स्वतःच्या बापाच्या स्वाभिमान आणि विचारांना तिलांजली देऊन मुख्यमंत्रिपद बळकावले. मुख्यमंत्री हा संपूर्ण मंत्रिमंडळाचा सेनापती असतो. पण, याच सेनापतीने कायदा आणि अधिकारांचा गैरवापर करत, गुन्हेगार आणि निलंबित आपला 'पाळलेला कुत्रा' सचिन वाझे याला पदोन्नतीवर पोलिस सेवेत घेतले. नंतर त्याचा मध्यस्थीने गृहमंत्र्याना दरमहा १०० कोटी खंडणी गोळा करण्याचे फर्मान सोडले. अंबाणींच्या घराबाहेर स्फोटके असलेली कार ठेवली. या प्रकरणात निष्पाप मनसुख हिरेन या व्यापा-याचा बळी घेतला. सचिन वाझेच्या गुन्ह्याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर, 'वाझे काय लादेन आहे का'? असे निर्लज्जपणाचे समर्थन करताना तुमची नैतिकता कोठे गेली होती? कोरोनासारख्या भीषण संकटात तुमचे बगलबच्चे 'कफन घोटाळा', 'खिचडी घोटाळा' याद्वारे मराठी माणसाच्या 'प्रेतावरच्या टाळूवरचे लोणी' खात होते, तेव्हा डोळे झाकून हा तमाशा का बघत होते? दिशा सालियन प्रकरणात संशयित म्हणून आपल्या राजपूत्राचे नाव आले असता, सीबीआयला महाराष्ट्रात येण्यास बंदी का घातली? परराज्यातील पोलिस तपास करण्यासाठी आले असता, त्यांना निष्कारण क्वारंटाईन का केले? एकनाथ शिंदेंसारखे खरे नेते रस्त्यावर उतरून काम करत होते. पण, आपण गोधडीत घुसून मातोश्रीत लोळत पडला होता. पंतप्रधानांना डरपोक म्हणणारा तुमचा 'अतिशहाणा' नोकर याचे उत्तर देईल का? तुमच्या मंत्रिमंडळातील नवाब मलिक हा मंत्री देशद्रोही दाउदशी असलेल्या लागेबांध्याच्या आरोपातून तुरुंगात गेला. बारामतीच्या काकाने पत्रकार परिषद घेऊन मलिक राजीनामा देणार नाही, असे ठणकावून सांगितले. हा तुम्हालाच एकप्रकारे इशारा होता. मंत्रिमंडळात कोणाला घ्यायचे: आणि कोणाला काढायचे? हा मुख्यमंत्र्याचा अधिकार असतो. त्यावेळेस तुम्ही 'मिठाच्या गुळण्या' का धरून बसलात? हाच का तुमचा मर्दपणा? तुमचा घरगडी मोदी आणि त्यांच्या सरकारला 'पनोती' म्हणतो. मग, तुम्ही मुख्यमंत्री होताच, कोरोनाचे महाभयंकर संकट आले. हा तुमच्या 'पांढ-या' पायाचा पायगुण समजायचा का? गृहमंत्री चक्क खंडणीच्या आरोपात काही दिवस फरार होतो. नंतर त्याला अटक होते. या घटनेने महाराष्ट्राच्या इज्जतीचे धिंडवडे देशाच्या वेशीवर टांगले गेले. तेव्हा मुख्यमंत्री म्हणून तुम्ही नैतिकता दाखवून का नाही दिला राजीनामा?

आताच्या सरकारच्या नावाने 'भ्रष्टाचारा'चे गळे काढता? मग, 'पत्राचाळ', 'कफन', 'मिठी नदी गाळ', 'खिचडी', 'खंडणी वसुली' हे 'भ्रष्टाचार' नव्हे तर, 'शिष्टाचार' होते, असे आपणास म्हणायचे आहे का? गोर-गरिबांची खिचडी खात, त्यांच्या पोटावर तर मारलेच, पण, तेवढ्यानेही पोट भरले नाही म्हणून, 'मिठी' नदीचा 'गाळ' ही खाल्ला? कोठे फेडाल हे पापे? मुख्यमंत्री फडणवीस यांनी कलंकित मंत्र्यांना समज दिली, असा आरोप करताना किमान आपल्याला तेवढा तरी मुख्यमंत्री म्हणून अधिकार होता का? तोंडातून 'ब्र' शब्द जरी काढायचा, तरी काकाची परवानगी घ्यावी लागायची. 'दगडाला शेंदूर फासल्या'गत 'नामधारी मुख्यमंत्री' म्हणून आपणास त्या खुर्चीवर बसविले होते, किमान याचे तरी भान ठेवले असते तर, आपले हसू झाले नसते. कारण, आंदोलनात 'महाविकास आघाडी सरकारचे करायचे काय? खाली डोके वर पाय' अशा घोषणा देत, तुमचे बगलबच्चे तुमचीच खिल्ली उडवत होते. यावर कळस म्हणजे, तुम्हीही म्हणालात की, 'सरकारला डोकेच नाही, तेथे खोके आहे'. म्हणजेच, एकप्रकारे तुम्ही तुम्हाला आणि तुमच्या सरकारला डोके नव्हते, हे किमान आता तरी कबूल केले. तसेच, एका भाषणात तुम्ही स्वतःचा उल्लेख 'मुर्ख मुख्यमंत्री' असा केला होता, यावरही शिक्कामोर्तब करून टाकले.

आंदोलनाच्या आदल्या दिवशी, नेहमीप्रमाणे सकाळी सकाळी 'स्टँडअप' कॉमेडी करताना तुमच्या घरगड्याने 'तुमच्या जखमेवर मिठ चोळत' एक भविष्यवाणी केली. 'फडणवीस हे आयोगाचे लाभार्थी आहेत, चोर आहेत. ५० जागा निवडणूक आयोगाच्या मदतीने चोरल्यामुळे देवेंद्र फडणवीस पंतप्रधान झाले, असे वक्तव्य त्यांनी केले(अर्थात, पुढे फडणवीस पंतप्रधान होतील, हे यांना चांगलेच ठाऊक आहे. कळत नकळत पोटातील गोष्ट ओठांवर आली)

आज 'लोकशाही' नावाची गोष्टच शिल्लक राहिली नाही, असे तुम्ही विरोधक बोंबलता. तुमचे सरकार असताना राणा दाम्पत्यावर 'देशद्रोहा'चा खटला दाखल करून तुरुंगात डांबले. केतकी चितळे हिने एक पोस्ट फॉरवर्ड केली तर तिला अटक करून हीन वागणूक दिली गेली. निखिल भामरे या तरुणाचाही असाच छळ केला. अर्णव गोस्मावी याला घरातून फरफटत आणत तुरुंगात डांबले. केंद्रीय मंत्री असूनही नारायण राणेंना जेवत्या ताटावरून उठवून अटक केली. कंगणा राणावतचे ऑफिस तोडले (नंतर न्यायालयाने आपल्याला फटकारले हा भाग वेगळा). या सर्वांचा तितका गंभीर गुन्हा होता का? अनंत करमुसेला अमानुष मारहाण करणा-या मंत्र्याचा राजीनामा तर दूरच (काकाचा बगलबच्चा होता ना) पण साधी कारवाई तरी करण्याची हिंमत आपण त्यावेळी मुख्यमंत्री या नात्याने दाखविली का? परमवीरसिंगांनी अनिल देशमुखांच्या 'कारनाम्या'चे पत्र पाठवले होते. काकाचा माणूस म्हणून त्या पत्रालाही 'वाटाण्याच्या अक्षदा' दाखविल्यात का ? शर्मा नावाच्या वृध्द नौदल अधिका-याला घरात घुसून तुमच्या बगलबच्च्यांनी गंभीर मारहाण केली. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी मातोश्रीवर बोलावून त्यांचा सत्कार केला. वरतून 'भिऊ नका मी तुमच्या पाठीशी आहे' अशी शाबासकीची थापही दिली. सुशांतसिंग आणि दिशा सालियन प्रकरणातील पुरावे वाझेकरवी नष्ट केले. प्रविण चव्हाण या सरकारी वकिलाला हाताशी धरून, फडणवीस आणि गिरिष महाजनांना खोट्या गुन्ह्यात अडकवून तुरुंगात डांबण्याचे 'षडयंत्र' रचले. तुमचा थापाड्या रोज उठून 'नाकाने कांदे सोलत' लोकशाहीबद्दल गळे काढतो. त्याने सांगावे की, तुमचे सरकार असतानाही कोणत्या प्रकारची 'आदर्श' लोकशाही होती?

'जैसी करणी वैसी भरणी' असा निसर्गनियम आहे. त्यातून कोणीच सुटत नाही. आपले दुर्दैव की, आपणास याची प्रचिती फक्त अडीच वर्षांत आली. सत्ता, पक्ष, चिन्ह, आमदार, खासदार, पदाधिकारी, कार्यकर्ते सगळेच गमविले. 'तेलही गेले, तूपही गेले हाती धुपाटणे आले', अशी आपली अत्यंत दयनीय आणि केविलवाणी अवस्था झाली. स्वतःच्या आणि पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिल्याने एका साध्या पतपेढीच्या निवडणुकीसाठी 'संपलेल्या पक्षाशी' युती करावी लागते, यापेक्षा दुसरे दुर्दैव काय असावे? एकिकडे राजकीय नव्हे तर, संविधान वाचविण्यासाठी आंदोलन असल्याचे सांगायचे; आणि दुसरीकडे आयोग हा भाजपचा हस्तक आहे. आमचा त्यावर अजिबात विश्वास नाही, असे म्हणत, 'दुतोंड्या गांडूळ' अशी अश्लील उपमा देत, घटनात्मक संस्थेचा अनादर करायचा. जेथे भाजपचा पराभव होईल, तेथे ईव्हीएम मशिन चांगले असते. आयोगही हस्तक नसतो. उपराष्ट्रपती जगदीप धनकड कोठे आहेत? असा काळजीयुक्त प्रश्न तुम्ही सरकारला विचारला. परंतु, जेव्हा तृणमुलचा खासदार त्यांचा अगदी वाईट पध्दतीने अपमान करत होता. तुमचे सध्याचे बापजादे त्यांचा व्हिडिओ काढत होते. तेव्हा तुमचे आणि तुमच्या नोकराचे 'मगरीचे अश्रू' आणि 'पुतणा मावशी'चे प्रेम कोठे गेले होते? जनादेशाच्या मतांवर दिवसाढवळ्या महादरोडा टाकल्या नंतर, मतदारांनी जी चपराक मारली, त्यातून विरोधक आजही सावरूच शकत नाहीत. विधानसभा तर गेलीच. पण, आता मुंबईसह इतर महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही जिंकणे अवघड झाले आहे. आज 'नाचता येईना, अंगण वाकडे' अशी काही अवघड अवस्था झाल्यामुळेच, यांना आयोगाकडून कोणतेही उत्तर नकोय. फक्त निरर्थक कांगावा करत, जनतेत संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि सहानुभूती मिळवण्यासाठी केलेली ही एक 'हास्यास्पद नौटंकी' आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आजच्या कलंकित मंत्र्यांचे राजिनामे मागण्याइतके तुम्ही काही 'धुतल्या तांदळासारखे स्वच्छ' अजिबातच नाही. उद्या तुमचे सरकार आले (तशी शक्यता कमीच आहे) तर अशीच नौटंकी बघायला मिळेल. कारण राजकारणात 'सब घोडे बारा टक्के' असे उगाचच म्हणत नाहीत. कारण, भ्रष्टाचार, खंडण्या, घोटाळे हे बहुतेक नेत्यांच्या 'पाचवीलाच पूजलेले' आहे, असो.

बिहारमध्ये बनावट मतदार याद्यांद्वारे निवडणूक आयोगावर केलेला 'मतचोरी'चा आरोप जेव्हा सिद्ध व्हायचा तेव्हा होईल. पण, 'चोराच्या उलट्या बोंबा' मारणा-या 'दरोडेखोरां'नी जनादेशावर दिवसाढवळ्या 'महादरोडा' टाकून 'मतचोरी' केली, हे मात्र 'सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ' स्पष्ट झाले आहे, हे मात्र नक्की.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक**
**मोबाईल क्र. ८७६७५९२९८०**

# इंग्रजांच्या भूमित इंग्रज अधिकारी कर्झन वायलीची हत्या करणारे महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा



मदनलाल धिंग्रा यांचा जन्म १८ सप्टेंबर १८८३ ला अमृतसर येथे उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील एक ख्यातनाम डॉक्टर होते आणि बंधू बॅरिस्टर होते. मदनलालांचे शिक्षण अमृतसरला झाले. ते पंजाब विद्यापीठातून बी. ए. झाले व १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तत्पूर्वी विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह झाला. इंग्लंडमध्ये त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचा अभ्यास केला. तेथील वास्तव्यात त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर, श्यामजी कृष्णवर्मा, हरदयाळ शर्मा वगैरे क्रांतिकारकांशी स्नेह जमला व तेथूनच त्यांच्या हृदयात क्रांतीची मशाल धकधकायला लागली. इंग्लंडमध्ये शिकत असताना त्यांनी सर विलियम कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या केली. या घटनेचा २० व्या शतकातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील पहिल्या क्रांतीकारी घटनांपैकी एक म्हणून उल्लेख केला जातो. मदनलाल धिंग्रा होमरूल लीग व सावरकरांच्या अभिनव भारत या संस्थांचे सभासद झाले. त्यांच्या भावनाप्रधान मनावर खुदिराम बोस व कन्हैयालाल या क्रांतीवीरांच्या बलिदानाचा फार मोठा परिणाम झाला होता. त्यांनी सशस्त्र क्रांतिवीरास साजेसे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी भारताच्या मंत्र्याचा स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली याच्या खुनाचा कट रचला. त्यांचा पहिला बेत फसला. पुढे १ जुलै १९०९ रोजी इंपीरियल इन्स्टिट्यूटच्या जहांगीर हाऊसमध्ये इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी त्यांनी कर्झन वायली यावर गोळ्या झाडल्या व त्यांची हत्या केली. कारण बंगालची फाळणी करण्यात कर्झन वायलीचा हात होता व भारतात ब्रिटिश सरकार व्दारे भारतीयांची अमानवी हत्या त्यांना पहावली नाही व अमानवी हत्यांचा बदला घेण्याच्या उद्देशाने इंग्लंडमध्ये म्हणजे त्यांच्या घरात घुसून कर्झन वायलीची हत्या केली व एक देशभक्त पूर्ण कृत्याच्या स्वरूपात विल्यस कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याला यमलोक पोहचविले व विदेशात जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करणारा २० व्या शतकातील पहिला स्वतंत्र चळवळीतील क्रांतिकारक म्हणून मदनलाल धिंग्रा यांचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतले जाते. या खुनाबद्दल मदनलाल धिंग्रा यांना अवघ्या महिन्याभरात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली व १७ ऑगस्ट १९०९ ला इंग्लंडच्या पेन्टोनव्हिल तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली व क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा भारत माता की जयच्या उद्घोषात हसत हसत फासावर गेले. अशा महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा यांना कोटी कोटी प्रणाम. फाशीवर जाण्यापूर्वीच्या शेवटच्या वक्तव्यात मदनलाल धिंग्रा म्हणले आहे आत्म बलिदान कसे करावे ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानात देण्यायोग्य आहे. ही शिकवण देण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वतःचे बलिदान करून मोकळे होणे होय. १७ ऑगस्ट १९०९ हा दिवस कुणीही सच्चा देशभक्त कधीही विसरणार नाही. कारण याच दिवशी सर विल्यम हट कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा हसत हसत फासावर चढले. आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी थोर क्रांतीकारकारकांच्या पावलावर पाऊल ठेवून देशहित कार्य करण्याची गरज आहे. देशात वाढता भ्रष्टाचार यावर अंकुश अती आवश्यक आहे. कारण आज वाढता भ्रष्टाचार व राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल करोडोंची संपत्ती यामुळे देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. क्रांतिकारकांनी देश स्वतंत्र करण्यासाठी आपले बलिदान दिले. परंतू आज आपण स्वतंत्र भारतात वावरतो आहे. त्यामुळे क्रांतिकारकांच्या बलिदानाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेऊन देशहिताचे कार्य केले पाहिजे व देशाला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजांनी देशाला लुटले त्यापेक्षा हजार पटीने आजचा भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरत आहे व देशाला खिळ-खिळा करीत आहे यावर सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे क्रांतिकारकांची जोत नेहमी प्रज्वलित रहावी व आपल्या हृदयात त्यांच्या आठवणी निरंतर जीवीत राहाव्यात यासाठी आजच्या दिवशी सरकार, प्रशासकीय विभाग, स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था व शाळा -महाविद्यालय यांनी वृक्षलागवडीला प्राधान्य दिले पाहिजे. कारण या दिवशी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला संपूर्ण क्रांतिकारकांचे अवश्य दर्शन होईल. शहीद मदनलाल धिंग्रा ह्यांना कोटी-कोटी प्रणाम, जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# गोपाळकाला




गोपाळकाला म्हटले की, उंचच्या उंच हंड्या आणि त्या फोडण्यासाठी जिवाचे रान करणारे तरुण डोळ्यांसमोर येतात; मात्र गोपाळकाला या सणाला आध्यात्मिक आणि पौराणिक पार्श्वभूमी असून ते शास्त्र लक्षात घेऊन साजरा केल्याने जिवाला त्याची अनुभूती घेता येते. गोपाळकाल्याचे अध्यात्मिक महत्त्व आणि त्याचे लाभ यांविषयीची माहिती या लेखातून जाणून घेऊया.

१. गोपाळकालाचा अर्थ

अ. श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोर्‍या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसर्‍या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.

आ. गोपाळकाला म्हणजे पांढर्‍या रंगाच्या पाच रसात्मक स्वादांचा अधिकाधिक प्रमाणात निर्गुण चैतन्याशी संबंध दर्शवणारा आणि पूर्णावतारी कृष्णकार्याचे दर्शक असलेला समूच्चय. काला हा शब्द एकसंध आणि वेगात सातत्य असणाऱ्या क्रियेशी संबंधित आहे. काला म्हणजे त्या काळाला, त्या स्थळाला, त्या त्या स्तरावर आवश्यक असे वैशिष्टपूर्ण कार्य दर्शवणाऱ्या घटनांचे एकत्रिकरण.

पूर्णावतारी कार्य हे स्थळ, काळ आणि स्तर या तीनही घटकांवर आदर्शवत असेच असते. या कार्यप्रक्रियेत विविधांगी जीवनाचे पैलू आध्यात्मिकरीत्या ईश्वरी नियोजनाद्वारे मानवजातीसमोर लीलया उलगडून दाखवले जातात. गोपाळकाला हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पूर्णावतारी कार्याचे प्रतिनिधित्व करतो.

२. काल्यातील प्रमुख घटक

पोहे, दही, दूध, ताक आणि लोणी हे काल्यातील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत.

अ. पोहे : वस्तूनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक (काहीही झाले, तरी श्रीकृष्णाला धरून ठेवणारे सवंगडी)

आ. दही : वात्सल्यभावातून प्रसंगी शिक्षा करणाऱ्या मातृभक्तीचे प्रतीक

इ. दूध : गोपींच्या सहज सगुण मधुरा भक्तीचे प्रतीक

ई. ताक : गोपींच्या विरोध भक्तीचे प्रतीक

उ. लोणी : सर्वांच्या श्रीकृष्णावरील अवीट प्रेमाच्या निर्गुण भक्तीचे प्रतीक

या दिवशी ब्रह्मांडात कृष्णतत्त्वाच्या आपतत्त्वात्मक प्रवाही गतिमान लहरींचे आगमन होते. काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात.

३. गोपाळकाला, गोपाळकाल्याची दिव्य चव आणि दहीहंडी फोडणे यांचा भावार्थ

अ. गोपाळकाला

दृश्य स्वरूपात गोपाळकाला म्हणजे कीर्तनानंतर किंवा गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी फोडून ग्रहण करतो, तो प्रसाद.

आ. गोपाळकाल्याची दिव्य चव

वरील सर्व पदार्थ एकत्र आणि एकजीव करून ग्रहण केल्यावर त्याची चव अवर्णनीय असते. त्याची चव अतिशय दिव्य असते.

इ. दहीहंडी फोडणे

दहीहंडी हे जिवाचे प्रतीक आहे. दहीहंडी फोडणे, हे जिवाने देहबुद्धी सोडून आत्मबुद्धीत स्थिर होणे, या अर्थाने आहे आणि दिव्य चव हे आनंदाचे प्रतीक आहे.

**: संदर्भ :**
**सनातन-निर्मित ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते**
**संकलन : सौ. अंजली पाध्ये**
**सनातन संस्था, नागपूर**
**संपर्क ९९७५५३६९०६**

# राष्ट्रीय सणानंतरही राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा

७९ वा स्वातंत्र्यदिवस संपूर्ण भारतामध्ये अतिशय आनंदाने व प्रसन्नतेचे साजरा करण्यात आला. देशभक्तीपर, गौरवशाली गाण्यांनीगल्ली पासून ते दिल्ली पर्यंत वातावरण दुमदुमले. शाळकरी मुले, महाविद्यालयीन तरुण तरुणी, शासकीय कर्मचारी व इतर नागरिक सकाळी लवकर उठून ध्वजारोहणासाठी तयारी करून हजर झाले. रस्त्या- रस्त्यावर आपल्या देशाच्या राष्ट्र ध्वजाचे प्रतीक असलेले खिशाला लावण्यासाठी बिल्ले, तीन रंगांचे फुगे त्याचबरोबर नायलॉन, प्लास्टिक व कागदी झेंडे यांचे दुकाने थाटलेले दिसत होते. हर घर तिरंगा या अभियांना अंतर्गत संपूर्ण भारतात घरोघरी झेंडे लावले. भ्रमन ध्वनीमध्ये सेल्फी कैद केल्या. शाळकरी मुले, कर्मचारी राष्ट्रध्वजाचे प्रतीक असलेले बिल्ले खिशाला लावून अभिमानाने मिरवत होते. काही दुचाकी व इतर वाहनांवर झेंडे लावलेले दिसून येत होते. त्याचप्रमाणे काही दुकानांना तिरंगी फुगे लावून सजवलेले दिसून येत होते. देशप्रेमाने प्रेरित होऊन समस्त भारतीय नागरिक ज्याच्या त्याच्या परीने देशाला व सैनिकांना मानवंदना देत होते काही चित्रकार, वाळू कलाकार, निसर्गप्रेमी त्यांच्या कलेतून राष्ट्रध्वजाला सलामी देऊन आपापली कला सादर करत होते. ऑपरेशन सिंदूर चे प्रतिकात्मक पोस्टरर्स लावून शूर सैनिकांना मानवंदना देत होते. अर्थात प्रत्येक भारतीय नागरिक देशाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त देशाप्रती आदर, प्रेम व्यक्त करत होता. हे मनमोहक दृश्य बघून मन दिवसभर अगदी प्रसन्न झाले.

देशाची राजधानी दिल्ली येथे भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान सहित तिन्ही दलाचे प्रमुख उपस्थित होते. त्याच प्रमाणे ऑपरेशन सिंदूर यशस्वी करणारे सर्व सैनिक मोठ्या उत्साहाने आपला राष्ट्रीय सण साजरा करण्यासाठी उपस्थित होते. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतातील कलाकार आपल्या कलेच्या माध्यमातून भारतीय ध्वजाला सलामी देत होते. स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून खरोखरच हा नयनराम्य सोहळा बघून अतिशय अभिमानास्पद असे चित्र दिसून येते. सध्याच्या काळात समाज प्रसाराच्या माध्यमातून नागरिक एकमेकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत होते. टीव्ही चॅनलवर स्वातंत्र्यदिनानिमित्त दिवसभर वेगवेगळ्या स्वरूपाचे देशभक्तीचे प्रदर्शन चालू होते. दरवर्षी सायंकाळी नेहमीप्रमाणे शाळा, महाविद्यालय शासकीय निमशासकीय कार्यालये व सहकारी संस्था आपल्या राष्ट्रध्वजाला सन्माणाने खाली उतरवतात व सन्मानाने जतन करून ठेवतात. स्वातंत्र्य दिनानिमित्ताने संपूर्ण भारतभर देशाच्या तिरंगा ध्वजाचा सन्मान राखला गेला. हल्ली भारतीय ध्वजाचे प्रतिक म्हणून तिरंगा अश्या वास्तू साहित्य जसे की, प्लॅस्टिक, कागदी ध्वज, पितळी बिल्ले, तीन रंगांचे फुगे वापरून आपला राष्ट्रीय सण अगदी उत्साहात सर्वजण साजरा केल्या जात आहे. ही अतिशय आनंदाची बाब आहे मात्र, आपल्या दुचाकी, चारचाकी अथवा इतर वाहनां वर जे प्लास्टिकचे ध्वज लावलेल्या असतात त्याचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. काही तांत्रिक कारणामुळे राष्ट्रध्वज तुटतो, मुलांच्या हातातून उडून पडतो, खिशाचा राष्ट्रध्वजाचा बिल्ला खाली पडतो त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी दुचाकी, चारचाकी उभी केली असता भटकी जनावरांकडून किंवा हवेमुळे खाली पडतो. ते तसेच जमिनीवर पडून राहतात. हवेबरोबर इतरत्र उडून कचऱ्याच्या ठिकाणी पडतात. झाडांच्या फांद्यामध्ये अडकतात. तुटतात, फाटतात. कालांतराने आपला प्राणप्रिय राष्ट्रध्वज पायदळी येऊन त्याचा अवमान होण्याची शक्यता असते म्हणून शाळकरी मुले, महाविद्यालयीन तरुण तरुणी, कर्मचारी व इतर नागरिक यांनी वैयक्तिक व सार्वजनिक ठिकाणी आपला राष्ट्रीय ध्वज व इतर भारतीय ध्वजांची प्रतिके असलेले साहित्य सन्मानाने, जीर्ण व खराब होण्याअगोदर उतरून किंवा काढून ठेवावी. जेणेकरून जमिनीवर पडून, पायदळी येऊन त्यांचा अवमान होणार नाही, याची काळजी घ्यायला घ्यावी.

अशा प्रकारे फक्त स्वातंत्र्यदिनीच नाहीतर, प्रत्येक दिवशी कायम राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा. जय हिंद!

**विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**
**मो नं ९७६३२८२०७७**

# 'अशा' चित्रपटाना होणारा विरोध रास्तच !

**वाचक लिहितात**

भारतीय समजमानावर चित्रपटांचा मोठा प्रभाव जाणवतो. चित्रपटातील कथानक, संवाद लोकांच्या मनावर घर करून राहतात. चित्रपटातील कलाकारांना लोक आदर्श मानतात त्यामुळे चित्रपट निर्मिती करताना लोकांच्या मनावर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी निर्माता दिग्दर्शकांनी घ्यायला हवी. पूर्वीच्या मराठी चित्रपटातून ती घेतली जात असे. गेल्या काही वर्षात मात्र चित्रपटनिर्मिती हा केवळ पैसा कमावण्याचे साधन झाले आहे. त्यामुळे लोकांना काय दाखवणे आवश्यक आहे यापेक्षा लोकांना काय बघायला आवडेल याचा विचार अधिक केला जातो मग ते नैतिकतेला किंवा सत्याला धरून असो वा नसो. नुकताच प्रदर्शित झालेला 'खालिद का शिवाजी' या मराठी चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा आहे. या चित्रपटात छत्रपती शिवरायांच्या सैन्यात पस्तीस टक्के मुसलमान होते आणि त्यांचे अकरा अंगरक्षक हे मुसलमान होते तसेच शिवरायांनी रायगडावर मशीद बांधली होती असे दाखवण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहासच जर दाखवायचा होता तर छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी घेतलेले परिश्रम, त्यांनी केलेले गनिमी कावे, मावळे आणि राजे यांच्यामधील अतूट नाते, त्यांची अस्मिता टिकवून ठेवणारे त्यांनी बांधलेले गडदुर्ग या पार्श्वभूमीवर चित्रपटातील दृश्य का चित्रित केली गेली नाहीत. या चित्रपटात एका वर्गाचे तुष्टीकरण केलेले दिसून येते आणि त्यासाठी असत्याचा आधार घेण्यात आलेला आहे. छत्रपती शिवरायांचा हिंदवी स्वराज्याचा इतिहास जरी भूतकाळ असला तरी वर्तमानात प्रत्येक शिवप्रेमींच्या मनात तो जागृत आहे. छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या लोककल्याणकारी हिंदवी स्वराज्याची महती आज साऱ्या जगाला ज्ञात आहे. आजच्या तरुणाईचे होत असलेले नैतिक अध:पतन, समाजाची दिवसागणिक होत असलेली अवनती, माजलेला भ्रष्टाचार आणि अनाचार पाहता देशात पुन्हा एकदा हिंदवी स्वराज्य स्थापन व्हावे अशी प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाची इच्छा आहे. 'खालिद का शिवाजी' सारखे चित्रपट मात्र समाजाला चुकीच्या प्रवाहाकडे नेण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे या चित्रपटाला होत असलेला विरोध रास्त आहे.

**लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

# माणसा का करतो, नात्यातील पावित्र्य कलंकित

हल्ली माणूस नातीगोती पार विसरून गेला आहे. कोणत्या नात्यासोबत कसा व्यवहार करायचा असतो? याचे जराही भान त्याला राहिले नाही. तो कोणत्याही नात्यासोबत ठराविक व नियमबद्ध व्यवहार न करता रानटी पशुप्रमाणे व्यवहार करू लागला आहे. त्याला स्वतःच्या स्वार्थापायी व लैंगिक वासनेपायी नातीगोती काहीच कळत नाही. तो कोणत्याही नात्यासोबत कसाही व्यवहार करून नात्यातील पावित्र्य कलंकित करत आहे. शाळेतील शिक्षकाचे विद्यार्थिनी सोबत लैंगिक संबंध किंवा शाळेतील शिक्षकानेच केले विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार, चुलत भावानेच केला चुलत बहिणीवर बलात्कार, चुलती व पुतण्याचे लफडे आले उजेडात किंवा पुतण्याने केले चुलतीवर लैंगिक अत्याचार, सख्ख्या बापानेच केला पोटच्या मुलीवर बलात्कार, अशा विषयाच्या कितीतरी बातम्या आपण रोज वर्तमानपत्रांत वाचत आहोत. टीव्हीवर किंवा सोशल मीडियावर रोज पाहत आहोत. अशा बातम्या वाचून सभ्य व सुसंस्कारी माणसाचे मन सुन्न होते. जन्म देणारा बापच जर पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करत असेल तर माणूस कोणत्या थराला गेलाय आणि माणूस इतका निष्ठुर व कठोर हृदयाचा कसा काय झालाय? हे कळायला मार्ग नाही. पोटच्या मुलीवर बलात्कार करताना त्या निर्दयी बापाला लाज कशी वाटली नसेल? त्याच्यातली मानवता कुठे चरायला गेली असेल? माणूस एवढा हैवानासारखा का वागत असेल? याचा प्रत्येकाने विचार करून बघावा, असे मला वाटते. माणूस लैंगिक वासनेपुढे कोणताच मागचा पुढचा विचार करत नाही. त्याच्यातली वासना उफाळून आली की, त्याच्यातला दुष्ट राक्षस जागा होतो आणि त्याला ना सखी बहीण कळते, ना चुलती कळते, ना स्वतःची मुलगी कळते, ना स्वतःची विद्यार्थिनी कळते, ना जन्मदाती आई कळते, तो वासनांध होऊन वासनेच्या नशेत यांच्यावर निर्दयी व निष्ठूरपणे बलात्कार व अत्याचार करून मोकळा होतो. म्हणून आजकाल नात्यातील पावित्र्य कलंकित होत आहे. माणुसकी सुद्धा ओशाळत आहे आणि माणसाला सांगत आहे की, माणसा नको करू रे नात्यातील पावित्र्य कलंकित. शेतीची वाटणी करताना किंवा घराची वाटणी करताना गुंठाभर जमिनीसाठी व इंचभर जागेसाठी सख्खे भाऊ पक्के वैरी बनून एकमेकांना भांडताना व हाणामारी करून घेताना दिसतात. स्वार्थापायी कोणत्याही थराला जाऊन कोणतेही टोकाचे पाऊल उचलतात आणि सख्ख्या भावाचाच काटा काढतात. पेरणीच्या तोंडावर शेतीच्या वादाचे अनेक खटले पोलीस स्टेशनमध्ये व कोर्टामध्ये रोज दाखल होत असतात. आई वडील जमीन नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना जिवानिशी मारणारे आणि आई वडिलांना घराबाहेर काढणारे महाभाग काही कमी नाहीत. अनेक बुवा महाराज व भोंदू बाबा भगवे वस्त्र परिधान करून एखाद्या मठात किंवा मंदिरात बसतात आणि अनेक महिला त्या भोंदू बाबाच्या शिष्य बनून त्याच्याकडे येतात, तेव्हा ते भोंदू बाबा त्या महिलांना सांप्रदायिक शिकवण न देता, त्यांची दिशाभूल करून व त्यांना फसवून त्यांचे लैंगिक शोषण करतात आणि गुरु शिष्याच्या पवित्र नात्याला कलंकित करतात. सांगायचे तात्पर्य एवढेच की, एकेकाळी नात्यांमध्ये असणारे नितळ प्रेम, निखळ माया व निकोप प्रेम आता लयाला जाऊन माणूस राक्षस बनला आहे आणि राक्षसी कृत्य करून जोडलेल्या व रक्ताच्या नात्यातील पावित्र्याला कलंकित करत आहे. कारण एकेकाळी माणूस सुसंस्कारी, दयाळू, मायाळू आणि मानवता जपणारा सभ्य माणूस होता. तेव्हा घरोघरी टीव्ही नव्हत्या. प्रत्येकाकडे महागडे मोबाईल नव्हते. त्याकाळी संस्काराची रुजवन करणारे आजी आजोबा प्रत्येक घरी असायचे. घरातील आई वडील व आजी आजोबा आपल्या मुलांवर चांगले संस्कार रुजवायचे. तेव्हाची शालेय शिक्षण प्रणाली सुद्धा सुसंस्कारी व दर्जेदार होती. शिक्षक सुद्धा विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच संस्काराची शिदोरी सुद्धा द्यायचे. म्हणून तेव्हाचे विद्यार्थी चांगले घडायचे आणि आपले नाव कमवायचे. म्हणून विद्यार्थ्यांवर कोणत्याच गोष्टीचा वाईट परिणाम होत नव्हता. त्यांच्यातील वासना आताच्या एवढी उफाळून येत नव्हती. स्वार्थ आजच्या एवढा बोकाळला नव्हता. म्हणून तेव्हा नात्यातील ऋणानुबंध कायम टिकून होता. नात्यातील पावित्र्य बावनकशी सोन्यासारखे चमकायचे. आता घरोघरी प्रत्येकाकडे मोबाईल आला आहे. प्रत्येक घरात मोठा टीव्ही आहे. टीव्हीवर नको ते घाण घाण सीन दाखवतात. प्रत्येक चित्रपटात अश्लीलता ठासून भरलेली असते. मोबाईल मध्ये सुद्धा तेच पाहायला मिळते. फेसबुक, युट्युब व गुगलवर विद्यार्थी घर बसल्या नको ते सर्च करून पाहत असतात. मोबाईलचा चांगला वापर करण्यापेक्षा वाईट व सेक्सी फिल्म बघण्यासाठी मुले मोबाईलचा वापर करत असतात. यातूनच मुलांमध्ये लैंगिक वासना वाढीस लागते आणि वासनेपुढे ते बेभान होतात, त्यांना नातीगोती, बहिण, चुलती, ना आई, हे काहीच कळत नाही. ते वासनांध होऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करून नात्यातील पावित्र्य डागाळतात आणि मानवतेला अशोभनीय वर्तन करून माणुसकी सुद्धा कलंकित करतात. ही आपल्या देशासाठी फार मोठी धोक्याची घंटा आहे. कारण याचा परिणाम थेट आपल्या देशाच्या विकासावर होतो. वाचक मित्रांनो जास्त काही न लिहिता मला एवढेच सांगायचे आहे की, बांधवांनो आपल्यात असलेला निष्ठुर व निर्दयी हैवान बाजूला काढून समतेचा व मानवतेचा पुरस्कार करणारे महामानव आपल्या अंगात आणावेत आणि नात्याची गुंफण अधिक घट्ट करावी. नात्यात माया, ममता, प्रेम व आपुलकी वाढवावी. आणि प्रत्येक नात्यासोबत नियमबद्ध व चांगला व्यवहार करून नात्यातील पावित्र्य आणखीन पवित्र करावे. स्वतःमध्ये असलेला स्वार्थ, गर्व, अभिमान, माज आणि वासना यांचा त्याग करून प्रत्येकासोबत चांगला ऋणानुबंध ठेवा. एकमेकांच्या मदतीला धावून जा, एकमेकांच्या अडीअडचणी सोडवा, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जा, एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवा, वृद्ध आई-वडीलांना अंतर देऊ नका...मग बघा खरंच होईल का? नात्यातील पावित्र्य कलंकीत....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो. क्र. ७४९८७१५६६१**

# महिंद्राची ग्लोबल व्हिजन २०२७ची घोषणा



**मुंबई, १६ ऑगस्ट :** महिंद्रा अँड महिंद्रा या भारतातील अग्रगण्य एसयूव्ही उत्पादक कंपनीने आज एनयूआयक्यू हा आपला पूर्णपणे नवा, मॉड्युलर व बहुऊर्जा प्लॅटफॉर्म सादर केला. हा प्लॅटफॉर्म पुढच्या पिढीतील क्रांतिकारक एसयूव्हींच्या नव्या श्रेणीचा पाया ठरणार आहे. या निमित्ताने कंपनीने या प्लॅटफॉर्मवर चार जागतिक दर्जाच्या एसयूव्हींच्या संकल्पना दाखवून आपली पुढील पिढीतील उत्पादने कशी असतील याची झलक दिली.

महिंद्रा अँड महिंद्राच्या ऑटोमोटिव्ह बिझनेस विभागाचे नियोजित प्रमुख आणि महिंद्रा इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आर. वेलुसामी म्हणाले, एनयू-आयक्यू हा महिंद्राच्या जागतिक एसयूव्हींसाठीचा भविष्यातील धोरणात्मक प्लॅटफॉर्म आहे. त्याच्या मॉड्युलर व बहुऊर्जा रचनेमुळे आम्हाला वेगवेगळ्या प्रकारच्या टॉप हॅट्स आणि पॉवरट्रेनमध्ये नाविन्य आणण्याची संधी मिळेल आणि त्यातूनही आमच्या एसयूव्हींच्या मूळ गुणसूत्रांशी निष्ठावान राहता येईल. परस्परविरोधी वैशिष्ट्यांचा समतोल साधण्यासाठी डिझाइन केलेला हा एनयू-आयक्यू प्लॅटफॉर्म आमच्या पुढील पिढीच्या एसयूव्हींचा पाया आहे. हे एक धाडसी पाऊल आहे, ही एका नव्या युगाची सुरुवात आहे. यामध्ये ग्राहकांना तडजोडींपासून मुक्त करून, त्यांना खरोखरच हव्या हव्या वाटणाऱ्या, प्रीमियम दर्जाच्या एसयूव्ही मुख्य प्रवाहात आणल्या जातील.

महिंद्रा अँड महिंद्राच्या ऑटो आणि फार्म सेक्टर्सचे चीफ डिझाइन अँड क्रिएटिव्ह ऑफिसर प्रताप बोस म्हणाले, मुंबई आणि इंग्लंडमधील बॅनबरी येथील आमच्या ग्लोबल डिझाइन स्टुडिओमध्ये तयार करण्यात आलेल्या एनयू-आयक्यू एसयूव्ही आमच्या हार्टकोअर डिझाइन तत्त्वज्ञानाच्या नव्या पर्वाची सुरुवात दर्शवतात. माणसांमध्ये आणि त्यांच्या वाहनांमध्ये भावनिक नाते निर्माण करणारे डिझाईन हेच उत्तम असते, या आमच्या मुख्य विचारावर या संकल्पना आधारित आहेत. याच तत्त्वाने नव्या भविष्यासाठी ही डिझाईन्स साकारण्यात आली आहेत. विरोधाभासाचे आकर्षण या संकल्पनेवर आधारित, परस्परविरोधी घटकांची सांगड घालून अभिव्यक्तिपूर्ण डिझाइनची परिभाषा येथे तयार करण्यात आली आहे. या संकल्पना जगाच्या कोणत्याही भागात, कोणत्याही भूभागावर साहस, आत्मविश्वास आणि नात्यांची प्रेरणा देणारे अनुभव देण्याचे आश्वासन देतात.

महिंद्रा अँड महिंद्राच्या ऑटोमोटिव्ह विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महिंद्रा इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल लि.चे कार्यकारी संचालक नलिनीकांत गोल्लागुंटा म्हणाले, एनयू-आयक्यू हा प्लॅटफॉर्म नाविन्यता, जागतिक दर्जाचे डिझाइन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम आहे. भारतामध्ये तसेच उजव्या व डाव्या बाजूने चालवल्या जाणाऱ्या वाहनांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये ऑटोमोबाईल उद्योगातील पोकळी हा प्लॅटफॉर्म भरून काढणार आहे. आम्ही इथे सादर करत असलेल्या चार संकल्पना भविष्यात येणाऱ्या गोष्टींचा धाडसी आराखडा दाखवतात. कोणत्याही तडजोडीशिवायच्या नव्या गतिशीलतेच्या युगाची सुरुवात या संकल्पना करतात आणि स्वातंत्र्य या संकल्पनेला नव्या अर्थाने परिभाषित करतात.

# सॅमसंगने नवीन प्रीमियम एक्स्पेरिअन्स स्टोअर लाँच करत मुंबईतील रिटेल उपस्थितीचा विस्तार

**गुरूग्राम, १६ ऑगस्ट :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने लोटस ट्रेड सेंटर, अंधेरी पश्चिम, मुंबई येथे नवीन प्रीमियम एक्स्पेरिअन्स स्टोअर लाँच करत आपली प्रीमियम रिटेल उपस्थिती अधिक विस्तारली आहे.

१,६०० चौरस फूट जागेवर पसरलेले हे विस्तृत स्टोअर ग्राहकांकरिता सर्वसमावेशक गंतव्य आहे, जेथे ते सॅमसंगचे आधुनिक इनोव्हेशन्स आणि कनेक्टेड इकोसिस्टम एकाच ठिकाणी एक्स्प्लोअर करू शकतात.

मुंबई प्रमुख रिटेल व लाइफस्टाइल हबमध्ये धोरणात्मकरित्या स्थित या स्टोअरमध्ये समर्पित झोन्स आहेत, जेथे सॅमसंगच्या गॅलॅक्सी डिवाईसेसची संपूर्ण श्रेणी पाहायला मिळते. या श्रेणीमध्ये नवीन स्मार्टफोन्स, टॅब्लेट्स, लॅपटॉप्स, स्मार्टवॉचेस आणि प्रगत स्मार्टथिंग्ज इकोसिस्टमचा समावेश आहे. इंटरॲक्टिव्ह डिस्प्ले आणि प्रायोगिक झोन्ससह अभ्यागतांना सॅमसंगचे तंत्रज्ञान उत्पादकता, मनोरंजन,



वेलनेस आणि स्मार्ट होम ऑटोमेशनमध्ये कशाप्रकारे वाढ करते हे पाहायला मिळू शकते, ज्यामधून वास्तविक कनेक्टेड जीवनशैलीचा अनुभव मिळतो.

सॅमसंगमध्ये आम्ही प्रेरणादायी रिटेल अनुभवांच्या माध्यमातून ग्राहकांना नाविन्यता देण्याप्रती समर्पित आहोत. अंधेरी पश्चिम, मुंबई येथे लाँच करण्यात आलेले आमचे प्रीमियम एक्स्पेरिअन्स स्टोअर आमची प्रीमियम रिटेल उपस्थिती वाढवण्यासाठी आणि तंत्रज्ञान, सहभाग व सेवेसाठी ऑल-इन-वन गंतव्य निर्माण करण्यासाठी आमच्या प्रवासामधील महत्त्वपूर्ण टप्पा आहे,'' असे सॅमसंग इंडियाच्या डी२सी बिझनेस व कॉर्पोरेट मार्केटिंगचे उपाध्यक्ष, प्रमुख सुमित वालिया म्हणाले.

सॅमसंगच्या प्रमुख लर्न सॅमसंग' उपक्रमाचा भाग म्हणून स्टोअर नियमितपणे वर्कशॉप्सचे आयोजन करेल, जेथे गॅलॅक्सी डिवाईसेसचा वापर करत एआय-समर्थित फोटोग्राफी, उत्पादकता, सर्जनशीलता आणि डूडलिंगवर लक्ष केंद्रित करण्यात येईल. या वर्कशॉप्सचा मिलेनियल्स आणि जनरेशन झेड ग्राहकांना दैनंदिन जीवनात त्यांचा डिवाईस वापर वाढवण्यास सक्षम करण्याचा मनसुबा आहे. तसेच या स्टोअरमध्ये संपूर्ण सुविधांनी युक्त सर्विस सेंटर आहे, ज्यामधून ग्राहकांना खरेदीनंतर त्वरित व विश्वसनीय पाठिंबा मिळेल.

या स्टोअरमध्ये डिजिटल इंटरफेस सॅमसंग स्टोअर+ देखील आहे, जे स्टोअरमध्ये येणाऱ्या ग्राहकांना उत्पादनाबाबत सविस्तर माहिती एक्स्प्लोअर करण्यास आणि सोईस्करपणे होम डिलिव्हरीची निवड करण्यास सक्षम करते. तसेच, स्टोअरमधील समर्पित सर्विस सेंटर ग्राहकांना खरेदीनंतर उत्साहपूर्ण सपोर्टची खात्री देते.

# इंडियन ऑईलच्या पानीपत रिफायनरीला देशातील पहिला आयएससीसी कॉर्सिया प्रमाणपत्र सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल उत्पादनासाठी मान्यता



**नागपूर, १६ ऑगस्ट :** भारताच्या स्वच्छ उर्जेच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कामगिरीत इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लि. (इंडियनऑईल) देशातील पहिले आयएससीसी कॉर्सिया प्रमाणपत्र प्राप्त करणारे ठरले आहे. हे प्रमाणपत्र, सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएलच्या व्यावसायिक उत्पादनासाठी आवश्यक अट असून, भारताच्या सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल उत्पादन, प्रमाणन आणि वितरण क्षमतेत मोठी प्रगती दर्शवते.

या यशाचा विशेष समारंभ नवी दिल्ली येथे पार पडला. यावेळी मेसर्स कोटेक्ना (आंतरराष्ट्रीय प्रमाणन आणि तपासणी सेवा देणारी कंपनी) यांनी औपचारिकरीत्या प्रमाणपत्र ए. एस. सहनी, अध्यक्ष, इंडियन ऑईल यांना प्रदान केले. या कार्यक्रमाला रोहित माथुर, संयुक्त सचिव, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय आणि श्री मनीष कुमार, संयुक्त महासंचालक, डीजीसीए यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमास पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय आणि नॅशनल ॲक्रेडिटेशन बोर्ड फॉर सर्टिफिकेशन बॉडीजचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

या उपलब्धीबद्दल इंडियनऑईलचे अध्यक्ष, संयुक्त सचिव (पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय) ,संयुक्त महासंचालक (नागरी विमान वाहतूक महासंचालनालय), वरिष्ठ संचालक (नॅशनल ॲक्रेडिटेशन बोर्ड फॉर सर्टिफिकेशन बॉडीज) यांनी कौतुक व्यक्त केले. त्यांनी एमओपी अँड एनजी, डीजीसीए, नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणन संस्था मेसर्स कोटेक्ना यांच्या समन्वयित प्रयत्नांचे विशेष कौतुक केले, ज्यामुळे भारताच्या नियामक व उत्पादन संरचना हरित विमान वाहतुकीतील आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींशी सुसंगत झाल्या आहेत.

आयएससीसी कॉर्सिया प्रमाणपत्र म्हणजे आंतरराष्ट्रीय शाश्वतता आणि कार्बन प्रमाणन असून, आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेने विकसित केलेल्या कॉर्सिया कार्बन ऑफसेटिंग आणि आंतरराष्ट्रीय विमान वाहतूकसाठी कार्बन कपात योजना अंतर्गत तयार करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र सुनिश्चित करते की सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल आंतरराष्ट्रीय शाश्वतता आणि कार्बन उत्सर्जनाच्या सर्वोच्च मानकांची पूर्तता करते.

इंडियनऑईलच्या पानीपत रिफायनरीत तयार झालेल्या सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल चे जीवनचक्र कार्बन उत्सर्जन आणि ट्रेसिबिलिटीसाठी कठोर मूल्यमापन करण्यात आले आहे. यामुळे भारतीय विमान कंपन्यांना प्रमाणित सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल त्यांच्या ऑपरेशन्समध्ये समाविष्ट करण्याचा स्पष्ट मार्ग उपलब्ध होईल. हे प्रमाणपत्र इतर देशांतर्गत रिफायनर्स आणि उद्योग क्षेत्रासाठीही एक आदर्श निर्माण करते, जेणेकरून सरकारच्या २०७० पर्यंत नेट-झिरो उत्सर्जन साध्य करण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल उत्पादन वाढवता येईल.

# महिंद्राच्या नागपूर प्लँटतर्फे ७९ वा स्वातंत्र्य दिवस साजरा



**नागपूर, १६ ऑगस्ट :** महिंद्रा ट्रॅक्टर्स या संख्येच्या बाबतीत भारतातील सर्वात मोठ्या ट्रॅक्टर उत्पादक कंपनीने आज भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त एक हृदयस्पर्शी व्हिडिओ प्रदर्शित केला. स्वतंत्र भारत, एकत्र भारत या संकल्पनेवर आधारित असलेल्या या व्हिडिओमध्ये महिंद्रा कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय भारताचे वैविध्य आणि महत्त्वाकांक्षा साजऱ्या करण्यासाठी एकत्र आले आहेत. महिंद्राच्या नागपूर प्लँट येथे चित्रित करण्यात आलेल्या या व्हिडिओमध्ये राष्ट्राभिमान, एकता आणि ४०० महिंद्रा नागपूर प्लँट कर्मचाऱ्यांची सर्जनशील अभिव्यक्ती दर्शवणारे आर्टवर्क पाहायला मिळते. भारत आपल्यासाठी काय आहे, हे या व्हिडिओमध्ये त्यांनी व्यक्त केलं आहे. राष्ट्राभिमानाचा त्यांच्यासाठी असलेला अर्थ, देशाचे वर्तमान आणि होऊन गेलेले हिरो यांच्या एकत्रीकरणातून भारताच्या झेंड्याचा मोठा फ्लिप-बोर्ड गुंफण्यात आला आहे. प्रत्येकाच्या कलात्मक सादरीकरणातून भव्य कॅनव्हास तयार झालेला आपल्याला पाहायला मिळतो.

कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणून अर्थपूर्ण निर्मिती करत महिंद्राने विविधता साजरी केली आणि देशाच्या वारसाचा सन्मान करत समाजभावनेप्रती बांधिलकी जपली आहे. या व्हिडिओतून देशभक्ती आणि महिंद्राचे प्रमुख तत्व - #TogetherWeRise यांचा मेळ घालण्यात आला असून एकत्रित ताकद व भविष्यासाठी एकतेची भावना त्यातून प्रतीत करण्यात आली आहे.

# झी टीव्हीवरील कलाकारांनी शेअर केल्या त्यांच्या जन्माष्टमीच्या आठवणी आणि गोष्टी!



**मुंबई, १६ ऑगस्ट :** जन्माष्टमी हा उत्सव संपूर्ण देशभरात भक्तिभावाने आणि आनंदाने साजरा केला जातो. हा उत्सव भगवान कृष्णाच्या जन्माचा आनंदोत्सव असून, त्यांची अनेक सुंदर रूपे आपण पाहतो लहान मुले पारंपरिक वेशभूषेत, डोक्यावर मोरपिस आणि हातात बासरी घेऊन लहान कृष्णाच्या रूपात सजतात; दहीहंडीच्या रोमांचक सोहळ्यात पथके एकत्र येऊन मानवी मनोरे रचून हंडी फोडतात. मंदिरे सजवली जातात, भजनांचा आणि बासरीचा सुरेल नाद वातावरणात भरून राहतो, आणि नाट्यरूपांतून कृष्णाच्या जीवनकथा पुन्हा सांगितल्या जातात. हा श्रद्धा, परंपरा आणि उत्सव यांचा सर्वात हृदयस्पर्शी संगम असतो.

या प्रसंगी झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबह फेम विजयेंद्र कुमेरिया, तुम से तुम तक मधील निहारिका चौक्सी, सरु मधील मोहक मटकर, जमाई नं. १ मधील अभिषेक मलिक, वसुंधरा मधील परिणिता बोरठाकूर आणि जाने अनजाने हम मिले मधील आयुषी खुराणा यांनी त्यांच्या जन्माष्टमीच्या आठवणी शेअर केल्या.

झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबह या मालिकेत सूरजची भूमिका साकारणारा विजयेंद्र कुमेरिया म्हणाला, जन्माष्टमी हा नेहमीच माझ्या हृदयाच्या खूप जवळचा सण राहिला आहे. लहानपणी हा सण म्हणजे जणू काही जादूच असायची. लहान कृष्णाच्या रुपात सजण्याची उत्सुकता पारंपरिक कपडे, दागिने आणि थोडा मेकअप यामुळे मी खूप खास आणि भक्तिभावाने जोडलेला वाटायचो. गुजरातमध्ये असताना मी प्रथम दहीहंडीचा अनुभव घेतला आणि मी फक्त प्रेक्षक न राहता त्या परंपरेचा खरा चाहता बनलो. आता मुंबईत राहताना, जिथे हा सण अप्रतिम उत्साहाने साजरा केला जातो, तिथे दरवर्षी तो पाहण्याची मी आतुरतेने वाट पाहतो. काळानुसार माझा जन्माष्टमीशी असलेला बंध फक्त उत्सवापलीकडे गेला आहे; माझ्यासाठी हा आनंद, श्रद्धा आणि कायमस्वरूपी आपलेपणाचा सण आहे.

झी टीव्हीवरील तुम से तुम तक या मालिकेत अनुची भूमिका साकारणारी निहारिका चौक्सी म्हणाली, माझ्यासाठी जन्माष्टमी नेहमीच माझ्या बालपणीच्या गोड आठवणी परत आणणारा सण राहिला आहे. मला आठवतंय, मी आईला आपल्या घरच्या देवळाची फुलांनी सजावट करण्यात मदत करत असे, लहान लहान कृष्णमूर्ती नीट मांडत असे आणि मध्यरात्रीपर्यंत आरतीसाठी जागी राहत असे. लहानपणी आम्ही सगळे मिळून कोणाचा बालगोपाळाचा झुला सर्वात सुंदर होईल याची स्पर्धा करत असू, आणि मला सगळ्यात आवडणारा भाग म्हणजे आईने बनवलेला प्रसाद. इथे मुंबईत दहीहंडी खूप उत्साह आणि जोशात साजरी केली जाते, पण घरी आम्ही ती साधेपणाने साजरी करतो पूजा, देवळाची सजावट आणि प्रसादाची तयारी करून. मी कुठेही असले तरी, हे छोटे छोटे विधी जन्माष्टमीला घरासारखे वाटू देतात.

झी टीव्हीच्या सरू मालिकेत सरूची भूमिका साकारणारी मोहक मटकर म्हणाली, काही सण आपल्या आयुष्यातील सर्वात आनंददायी आठवणी बनतात आणि माझ्यासाठी जन्माष्टमी हा खरोखरच त्यापैकी एक आहे. मुंबईच्या दादरमध्ये राहताना विशेषतः शिवाजी पार्कजवळ होणाऱ्या प्रसिद्ध दहीहंडी उत्सव पाहत मी या सणाच्या उत्साही वातावरणात वाढले आहे. मानवी पिरॅमिड तयार करणाऱ्या लोकांची ऊर्जा, स्पर्धात्मक वातावरण, आणि आजूबाजूला होणारे सांस्कृतिक कार्यक्रम हे सगळे मनाला भिडणारा अनुभव देतात. दरवर्षी मी जन्माष्टमीची आतुरतेने वाट पाहायचे, केवळ उत्सवासाठीच नाही, तर परफॉर्म करण्याची संधी मिळावी म्हणूनही. प्रत्येक परफॉर्मन्स हा श्रद्धा, प्रेम आणि कथा सांगण्याचा उत्सव वाटायचा.

झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिले या मालिकेत रीतची भूमिका साकारणारी आयुषी खुराणा म्हणाली, जन्माष्टमी हा नेहमीच आनंद, भक्ती आणि शांततेचा एक सुंदर मिलाफ बनून माझ्या मनात एक खास सण बनला आहे. मला आठवतंय लहानपणी, माझे आई-वडील मला मध्यरात्री मंदिरात घेऊन जायचे. आम्ही एका मंदिरातून दुसऱ्या मंदिरात जायचो, आणि प्रत्येक मंदिर सुंदर सजलेले असायचे. मला सगळ्यात जास्त उत्सुकता असायची ती कृष्णाच्या झुल्याची मला तो नेहमी जादुई वाटायचा. तसंच, मला अजूनही त्या गोड आठवणी आठवतात जेव्हा मी या काळात भगवान कृष्णावर आधारित ॲनिमेटेड मालिका पाहायचे, ज्यामुळे त्यांच्याशी माझे नाते आणखी घट्ट झाले. आणि अर्थातच, खाणे! मला अजूनही आठवतंय, घरगुती पंजीरी आणि गोड माखन-मिश्री प्रसाद म्हणून खाणे त्या चवी आजही मला थेट बालपणात परत नेतात. आता मुंबईत जन्माष्टमी साजरी करणे वेगळाच आनंद देते.

झी टीव्हीच्या जमाई नं. १ मालिकेत नीलची भूमिका साकारणारा अभिषेक मलिक म्हणाला, जन्माष्टमी माझ्या लहानपणीच्या काही अतिशय आवडत्या आठवणी परत घेऊन येते. एकदा मी शाळेच्या कार्यक्रमासाठी छोटा कृष्ण बनून सजलो होतो आणि आजही माझी आई त्या फोटोंना अभिमानाने दाखवते! दिल्लीमध्ये वाढताना हा सण मंदिर दर्शन, भजन आणि सुंदर सजवलेल्या झांकी पाहणे अशा पारंपरिक पद्धतीने साजरा होत असे. पण मुंबईत आल्यावर मला या सणाचा एक वेगळाच रंग पाहायला मिळाला. इथले दहीहंडी उत्सव मानवी पिरॅमिड, संगीत आणि प्रचंड उत्साहाने जयघोष करणारी गर्दी यांसह अफाट उर्जेने भरलेले असतात.

झी टीव्हीच्या वसुधा मालिकेत चंद्रिकाची भूमिका साकारणारी परिणिता बोरठाकूर म्हणाली, जन्माष्टमी माझ्या हृदयात एक खास स्थान राखून आहे. दरवर्षी मी हा सण माझ्या कुटुंबासोबत आणि जवळच्या मित्रमैत्रिणींसोबत घरीच साजरा करते. आम्ही सायंकाळी एकत्र जमतो आणि मध्यरात्री आनंद, संगीत आणि मनापासून केलेल्या प्रार्थनांसह साजरा करतो. त्या क्षणात काहीतरी अवर्णनीय जादू असते, जणू संपूर्ण वातावरण ऊर्जा आणि ऊब यांनी भरून गेलेले असते. वर्षानुवर्षे माझा भगवान कृष्णाशी असलेला संबंध अधिक घट्ट झाला आहे. माझ्या घरी मी एक छोटा कान्हाही ठेवला आहे पारंपरिक लाडू गोपाळ नाही, पण त्या मूर्तीची उपस्थिती माझ्या आयुष्यात शांतता आणि आधार देते. माझ्यासाठी जन्माष्टमी फक्त एक उत्सव नाही, तर स्वतःशी, आपल्या प्रियजनांशी आणि भगवान कृष्णाशी पुन्हा जोडले जाण्याची, थांबून विचार करण्याची वेळ आहे.

# डालमिया भारत फाउंडेशनकडून स्वातंत्र्यदिनानिमित्त तरुण कबड्डी खेळाडूंना क्रीडा साहित्याचे वितरण



**चंद्रपूर, १६ ऑगस्ट :** ग्रामीण क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी डालमिया भारत फाउंडेशन (डीबीएफ) अग्रगण्य सिमेंट कंपनी डालमिया भारत लि.चा कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) विभाग यांनी आदर्श किसान विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, नरांदा, चंद्रपूर येथील १६ तरुण कबड्डी खेळाडूंना क्रीडा साहित्याचे वितरण केले. स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून हे आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश तरुण खेळाडूंना प्रेरित करणे, त्यांना पाठबळ देणे आणि ग्रामीण भागात क्रीडाभावना वाढवणे हा आहे. नव्या किट्ससह सज्ज झालेल्या या दोन्ही कबड्डी संघांची १६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या तालुका-स्तरीय स्पर्धेसाठी तयारी सुरू आहे.

या सोहळ्याला डीसीबीएल, चंद्रपूरचे एचआर प्रमुख श्री. अर्णब बरुआ, आदर्श किसान विद्यालयाचे प्राचार्य श्री. अविनाश गुरु मुखी, डालमिया सिमेंटचे इतर अधिकारी तसेच संस्थेचे शिक्षक उपस्थित होते.

या उपक्रमाबद्दल बोलताना डीसीबीएल, चंद्रपूरचे युनिट हेड श्री. प्रणब कुमार नायक म्हणाले, डालमिया भारतमध्ये आम्ही तरुण प्रतिभांचा विकास करण्यास आणि त्यांना मोठ्या मंचावर झळकण्यासाठी संधी निर्माण करण्यास कटिबद्ध आहोत. आमचे तरुण खेळाडू हे उद्याच्या क्रीडा उत्कृष्टतेचे ध्वजवाहक आहेत. या स्वातंत्र्यदिनी, त्यांच्या प्रवासाला आम्ही आवश्यक संसाधने आणि प्रोत्साहन देऊन पाठिंबा देत असल्याचा आम्हाला अभिमान आहे.

हा उपक्रम, डालमिया भारत फाउंडेशन ज्या भागात काम करते, तिथे सततचा आणि सर्वांना सामावून घेणारा विकास करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची खात्री देतो.

# अदाणी इंटरनॅशनल स्कूल व इंटरनॅशनल स्कूल्स स्पोर्ट्स ऑर्गनायझेशनशी भागीदारी

**अहमदाबाद, १६ ऑगस्ट :** भारतातील आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी इंटरनॅशनल स्कूल्स स्पोर्ट्स ऑर्गनायझेशन (आयएसएसओ) आता अदाणी इंटरनॅशनल स्कूलसोबत मिळून देशातील क्रीडा शिक्षणाची रचना अधिक मजबूत करत आहे, जेणेकरून ती जागतिक दर्जाच्या शाळांच्या बरोबरीची होऊ शकेल. अदाणी इंटरनॅशनल स्कूलच्या प्रमोटर नम्रता अदाणी आता आयएसएसओ च्या सल्लागार मंडळाचा भाग आहेत आणि या उपक्रमाला पुढे नेताना त्याचे व्हिजन आणि दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करत आहेत.

२०१७ मध्ये स्थापित आयएसएसओ हीभारतातील एकमेव क्रीडा संघटना आहे, जी आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम असलेल्या शाळांसाठी समर्पित आहे. हे इंटरनॅशनल बॅकलॉरिएट (आयबी), कॅम्ब्रिज, एडएक्सल, तसेच अमेरिकन नॅशनल स्कूल बोर्ड्स असोसिएशन (एनएसबीए) यांसारख्या जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त बोर्ड्सशी संलग्न आहे.

आजपर्यंत ४३० पेक्षा जास्त शाळा, २२ खेळांचे प्रकार आणि दरवर्षी ३०० हून अधिक स्पर्धांचे आयोजन करत आयएसएसओने २२,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम केला आहे. त्यामुळे आयएसएसओ शालेय क्रीडाक्षेत्रात उत्कृष्टतेचे एक मानक बनले आहे.

कार्यक्रमात बोलताना आयएसएसओच्या डायरेक्टर आकांक्षा थापक म्हणाल्या, आम्ही नम्रता अदाणी आणि अदाणी ग्रुपचे स्वागत करतो, जे खेळांच्या



माध्यमातून युवा तरुणांना सक्षम बनवण्याच्या आमच्या सामायिक ध्येयाचा भाग झाले आहेत. अनेक वर्षांपासून आयएसएसओने आंतरराष्ट्रीय शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी एक व्यवस्थित मार्ग तयार केला आहे, ज्यामुळे ते स्पर्धात्मक खेळांद्वारे स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचू शकले आहेत. श्रीमती अदाणी यांच्या नेतृत्व आणि दूरदृष्टीमुळे हे सहकार्य आमच्या तयार केलेल्या इकोसिस्टमला अधिक मजबूत करेल. एकत्र मिळून आपण खेळांमध्ये आणखी मोठ्या संधी निर्माण करू आणि आंतरराष्ट्रीय शाळांमधील हजारो तरुण खेळाडूंना प्रेरणा देऊ.

अदाणी ग्रुपकडून नम्रता अदाणी म्हणाल्या, सध्या आपण भारताच्या शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहोत. या सहकार्याद्वारे आमचे उद्दिष्ट असे समावेशक आणि भविष्याभिमुख संस्थान उभारणे आहे, जिथे विद्यार्थी वर्गात आणि खेळाच्या मैदानात दोन्ही ठिकाणी उत्कृष्टता मिळवू शकतील. भारतातील आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये आयएसएसओच्या माध्यमातून संरचित आणि जागतिक दर्जाची क्रीडा संस्कृती रुजवण्यामध्ये मदत करणे ही आमच्यासाठी सन्मानाची बाब आहे.

आयएसएसओचे स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसजीएफआय) आणि इंटरनॅशनल स्कूल स्पोर्ट्स फेडरेशन (आयएसएफ) यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा संस्थांशी सहकार्य भारतीय विद्यार्थ्यांना सर्वोच्च स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम करते. आपल्या विशेष विभाग, इंटरनॅशनल बोर्ड स्कूल स्पोर्ट्स ऑर्गनायझेशन (आयबीएसओ) द्वारे आयएसएसओने हजारो विद्यार्थ्यांना एसजीएफआय नॅशनल्स, खेलो इंडिया गेम्स, सुब्रोतो कप आणि आयएसएफ वर्ल्ड चॅम्पियनशिपसारख्या मोठ्या स्पर्धांपर्यंत पोहोचण्यास मदत केली आहे.

अदाणी इंटरनॅशनल स्कूल आणि आयएसएसओ च्या या सहकार्यातून संरचित, पारदर्शक आणि व्यावसायिक पद्धतीने आयोजित होणाऱ्या स्पर्धांवर विशेष भर दिला जाईल. या स्पर्धांमुळे विद्यार्थी-खेळाडूंची प्रोफाइल मजबूत होईल आणि त्यांना जागतिक विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळविण्यास मदत मिळू शकेल.

हे सहकार्य आयएसएसओ च्या पुढील विकास टप्प्याला गती देईल, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय शाळांमधील विद्यार्थ्यांची एक पिढी शिक्षण आणि खेळ या दोन्ही क्षेत्रात उत्कृष्टता साध्य करण्यास सक्षम होईल आणि सीमा ओलांडून मोठी स्वप्ने पाहू शकेल.

# माझ्या जुळ्या बहिणीचे मला अस्तित्वच माहीत नव्हते, माझी तिची भेट वयाच्या पाचव्या वर्षी झाली,' सांगत आहेत म्हणते छोरियाँ चली गाँव मधील स्पर्धक समृद्धी ऊर्फ चिंकी-मिंकी



**मुंबई, १७ ऑगस्ट :** झी टीव्हीवरील छोरियाँ चली गाँव हा रिॲलिटी शो आपल्या सेलिब्रिटी स्पर्धकांच्या झगमगाटाच्या पलीकडचे खरे आयुष्य उलगडून दाखवत आहे. रणविजय सिंघाच्या सूत्रसंचालनाखाली सुरु असलेल्या या शोमध्ये अनिता हसानंदानी, ऐश्वर्या खरे, अंजुम फकीह, कृष्णा श्रॉफ, डॉली जावेद, एरिका पॅकार्ड, रमीत संधू, रेहा सुखेजा, सुमुखी सुरेश आणि लोकप्रिय जुळ्या बहिणी समृद्धी आणि सुरभी मेहरा (चिंकी-मिंकी) अशा अनेक प्रसिद्ध चेहऱ्यांचा समावेश आहे. बामुलिया गावात ग्रामीण जीवन अनुभवताना या शहरातल्या सुंदऱ्या स्वतःतील आणि एकमेकींतील नवे पैलू शोधत आहेत.

अशाच एका हृदयस्पर्शी क्षणी समृद्धीने आपल्या लहानपणातील एक अत्यंत वैयक्तिक आणि भावनिक आठवण प्रथमच उघड केली. तिने सांगितले की आयुष्याच्या पहिल्या २-३ वर्षांपर्यंत तिला स्वतःची एक जुळी बहीण - सुरभी आहे हेच माहिती नव्हते. पारंपरिक विचारसरणी असलेल्या कुटुंबात वाढताना या जुळ्या बहिणींना एकमेकींपासून दूर ठेवण्यात आले होते. मात्र त्यांच्या आईने घरातील निर्बंधांविरोधात उभे राहत लढा दिला आणि त्यानंतरच समृद्धीची आपल्या बहिणीची सुरभीसोबत पहिल्यांदा भेट झाली, तीही वयाच्या पाचव्या वर्षी. त्या दिवसापासून दोघींचे नाते अतूट राहिले आहे.

समृद्धी म्हणाली, आमचे कुटुंब इतके पारंपरिक होते की फक्त आम्ही दोघी मुली आहोत म्हणून माझ्या बहिणीला घरापासून दूर पाठवण्यात आले. मला तर हेही माहीत नव्हते की माझी एक जुळी बहीण आहे. त्या सुरुवातीच्या वर्षांत तिला आईचे प्रेमसुद्धा मिळाले नाही. पण आमच्या आईने आमच्यासाठी आवाज उठवला. संपूर्ण कुटुंबाशी भांडून ती आम्हांला पुन्हा एकत्र घेऊन आली. मी माझ्या बहिणीला पहिल्यांदा भेटले तेव्हा मी पाच वर्षांची होते. ती घरी आली तेव्हा मला हेही ठाऊक नव्हते की माझी एक अशी बहीण आहे जी अगदी माझ्यासारखी दिसते. त्या दिवसापासून आमचे नाते कधीच तुटलेले नाही. आमच्यासाठी आमची आईच सगळंकाही आहे.

छोरियाँ चली गाँवमधील हे क्षण आपल्याला सतत हेच सांगतात की प्रत्येक सेलिब्रिटीच्या प्रवासातही वेदना असतात आणि त्यावर मात करण्याची ताकदही. आणि हेच खरे, चिकाटीने भरलेले, न सांगितलेले अनुभवच या शो ला प्रेक्षकांच्या मनाशी इतके खोलवर जोडतात.


# तो स्वयंपाक करतो, अभिनय करतो आणि अपेक्षांचा स्तर उंचावतो भरत अहलावत म्हणजे आहे तो 'ग्रीन फ्लॅग' जो हवाहवासा वाटतो!

**मुंबई, १७ ऑगस्ट :** झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिले ही दोन आत्म्यांच्या नियतीने ठरवलेल्या भेटीची हृदयस्पर्शी कथा प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. जिथे ऑनस्क्रीन केमिस्ट्री आणि नाट्यप्रसंग प्रेक्षकांना खिळवून ठेवतात, तिथे अभिनेता भरत अहलावत, जो 'राघव'ची भूमिका साकारतोय, आपल्या चार्मिंग व्यक्तिमत्त्वाने खऱ्याखुऱ्या ग्रीन फ्लॅग हिरोप्रमाणे सर्वांची मने जिंकतोय. पण पडद्यामागे भरतचा एक असा पैलू आहे, जो त्याच्या चाहत्यांना नक्कीच आश्चर्यचकित करेल तो आहे एक उत्साही होम शेफ!

हो, तुम्ही बरोबर वाचलंत! या अभिनेत्याने आपली मेकअप रूमसुद्धा एका छोट्याशा, उबदार मिनी किचनमध्ये रूपांतरित केली आहे ज्यामध्ये आहे एअर फ्रायर आणि घरगुती, आरोग्यदायी पदार्थ बनवण्यासाठी लागणाऱ्या सगळ्या गरजेच्या वस्तू. झटपट खाऊपासून ते ऊबदार आणि दिलासा देणाऱ्या डिशेसपर्यंत, भरतचे हे कुकिंग प्रयोग सेटवर सगळ्यांचे लाडके बनले आहेत विशेषतः त्याच्या ऑनस्क्रीन शारदा बुआ, म्हणजेच जयती भाटिया यांच्यासाठी, ज्या प्रेमाने बनवलेल्या त्या पदार्थांचा आस्वाद आवर्जून घेतात. भरतच्या या विचारपूर्वक छोट्या कृती आणि त्याला स्वयंपाकासाठी असलेली ओढ यामुळे त्याच्या भूमिकेला तर अधिक चार्म मिळालाच आहे, पण तो सेटवरील संपूर्ण टीममध्ये एक अत्यंत आवडता कलाकारही बनला आहे.

भरत म्हणाला, स्वयंपाक करणे माझ्यासाठी स्ट्रेस बस्टर आहे, आणि आरोग्यदायी अन्न बनवण्याची मला नेहमीच आवड आहे. सेटवर आपण खूप तास घालवत असल्यामुळे बाहेरचे ऑर्डर करून खाण्यापेक्षा मला घरगुती पद्धतीचे अन्न खायला जास्त आवडते. म्हणूनच मी माझ्या मेकअप रूममध्ये एअर फ्रायर ठेवतो आणि गोड बटाट्याचे वेजेस, वेज टिक्का किंवा ग्रिल्ड चिकनसारखे झटपट स्नॅक्स किंवा हलके जेवण स्वतःसाठी तयार करतो.

# शब्दकोडे क्रमांक २१९३



**आडवे शब्द :-**

१) आग लावणारा पिशाच्चांचा राजा
४) प्रश्नोत्तरे
८) हस्त
१०) जरच्या मागोमाग येणारा करारातील शब्द
११) उत्सव
१२) पंख
१३) केस
१४) शुद्ध, पवित्र
१६) गोंधळ माजविणे, आरडाओरडा करणे
१८) भोळा
१९) सुवर्ण
२०) कापणे (इं.)
२१) नमस्कार
२२) गोमाता
२३) द्रवपदार्थ
२५) बोलून दाखविणे
२६) शाश्वत, चिरकाल
२९) लग्नानंतरची मिरवणूक
३१) पोपट
३२) दुप्पट (इं )
३४) कसेतरी, अनिच्छेने निर्जीवपणे
३६) ढगाळ वातावरण
३८) नम्रतेने वाकलेला
४१) जाडसर पीठ
४२) प्रहार
४४) गणती करणारा
४५) उत्तर दिशा, सवय, राबता
४७) बांगला देशाचे चलन
४९) युद्ध
५१) चेह-यावरील तेज, कांती
५३) नुकताच जन्माला आलेला
५६) क्षुल्लक, नीच, तेजोहीन
५९) अवस्था, स्थिती
६१) घेर, लोकांचा वेढा
६२) कागदी चलन
६३) माहितगार, जाणणारा
६५) जंगलातील वाट
६७) तर्क, ठोकताळा
६८) श्रीमंत
७०) गुंड, मोठा भाऊ
७१) फुलांचा राजा
७२) नवरदेव
७४) गर्दभ
७६) एक शेंगभाजी
७८) सैल
७९) द्रवपदार्थ
८१) अंगातील मस्ती
८४) संन्यासांचे निवासस्थान
८६) छोटी बैलगाडी
८७) घोडदळातील अधिकारी
८८) माल, वस्तू

**उभे शब्द :-**

१) आल्याची वडी
२) पगार
३) धातूचा धागा
४) हुक्की, लहर
५) दडून बसणे
६) सोन्याचा धागा
७) च्या सह
९) दागदागिने
११) चर्चा, विचारविनिमय
१५) एक उलटा पक्षी
१६) विद्या, चंद्राचा सोळावा भाग
१७) रौप्य
२१) पूर्ण उघडा दरवाजा
२४) फुरसत
२७) पाताळ
२८) तफावत
३०) रात्रीचा पाऊस
३१) मीठ
३३) माळी
३५) खांदा
३७) व-याचे तांदूळ
३९) चामखीळ
४०) स्तुती, स्तोत्र
४३) भात शिजताना होणारा आवाज
४६) खेळातल्य पत्त्यातील तीन माणसे
४८) फणसाचा एक प्रकार
५०) मृत्यू
५२) श्रीकृष्णाचे घराणे
५४) म्हैस, शिवाय
५६) भेग, चीर
५७) मनाच्या वेगाने जाणारा
५८) शिकार
६०) ऐटबाज, भपकेबाज
६३) हातचलाखी करणारा
६४) कच्छप, कूर्म
६६) नेहमी, सदोदित
६७) आकाश
६९) पर्वत
७३) रम्य
७५) सैलसर झालेले वस्त्र
७७) लाकूड छिलण्याचे हत्यार
८०) निवासस्थान
८२) चंद्र
८३) भीमाजवळचे शस्त्र
८५) शिक्षा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



महासागर

# अकोला

पान ६

●रविवार,दि.१७ ऑगस्ट २०२५


## पातुर–बाळापूर राज्य मार्गावर अपघात; दोघे जखमी



**पातुरः** बाळापूर राज्य मार्गावर देऊळगाव (ग्रामीण) परिसरात मंगळवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे चार वाजता मोटारसायकल व मलवाहतूक चारचाकी वाहनामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दोघे युवक गंभीर जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल क्रमांक एमएच ३० बीक्यू ८०४१ ही देऊळगावकडे जात असताना अज्ञात कारणाने एका चारचाकी मालवाहतूक वाहनाला (M H २०-EG८२१४ धडकली.

## शहरातील वाहतुकीत शिस्त आणा : जिल्हाधिकारी अजित कुमार



**■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :**

रस्त्यावरील बेशिस्त वाहतूक सर्वांचीच सुरक्षितता धोक्यात आणते. त्यामुळे नियमभंग करणा–यांना कायद्याची जरब निर्माण करावी व शहरातील वाहतुकीत शिस्त निर्माण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, पीडब्ल्यूडीचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, राज्य उत्पादन शुल्क जिल्हा अधिक्षक सीमा झावरे व अनेक अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, अनेकदा वाहनचालक, ऑटोचालक बेशिस्तीने कुठेही वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा आणतात. प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त व्यक्ती वाहनात, रिक्षात बसवल्या जातात. शाळकरी मुलांना घेऊन जाणा–या रिक्षातही क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी असतात. त्याबाबत शाळा, चालक संघटना व पालकांमध्ये जागृती करावी. अनेक बसचालक लक्झरी बसही कुठेही रस्त्यावर उभ्या करतात. हे सगळे थांबण्यासाठी कायद्याची जरब निर्माण करावी. प्रसंगी परवाने रद्द करावेत. मात्र, बेशिस्तांची गय करू नये.चुकीच्या दिशेने उड्डाण पूलावर शिरणा–या व्यक्तींवरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अशा चुकांमध्ये निरपराध व्यक्तींच्या जीवावर बेतू शकते. तसे यापूर्वी घडले आहे. पुलावर चुकीच्या दिशेने शिरता येऊ नये म्हणून स्पाईकगार्ड बसवावेत. पातूर माळराजुरा घाट वळणावर सुरक्षिततेच्या दृष्टीने अपघातप्रवण स्थळ असा फलक, रिफ्लेक्टर्स, रम्बलर्स आदी उपाययोजना करावी. वाडेगाव येथील जागेश्वर विद्यालयासमोर गतिरोधक, फुटपाथ व्यवस्था व्हावी, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले. आरटीओ व पोलीसांकडून दि. १६ ऑगस्टपासून मोहिम सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने ऑटोरिक्षा व इतर सार्वजनिक वाहनांची कडक तपासणी करण्याच्या दृष्टीने दि. १६ ऑगस्टपासून आरटीओ व पोलीसांच्या सहकार्याने मोहिम राबविण्यात येणार असल्याचे श्री. भुयार यांनी सांगितले.

# दहा हजार विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून घडवला विघ्नहर्ता

## वीस हजार हातांनी उमटवली पर्यावरणरक्षणाची भक्तीमुद्रा

**■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :**

**‘वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभः।**
**निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ’।।**
**गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया!!**

या जयघोषात अकोल्यात भक्तीभाव आणि पर्यावरणाचे संवर्धन एकत्र गुंफले गेले. निलेश देव मित्र मंडळाच्या उपक्रमात तब्बल दहा हजार विद्यार्थ्यांनी वीस हजार हातांनी शाडू मातीपासून श्रीगणेशाच्या मूर्ती घडवत विघ्नहर्त्याला भक्तीची आणि निसर्गाला संरक्षणाची अर्पणवेल अर्पिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि गणेश पूजनाने झाले. यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, अकोला अर्बन बँक चे अध्यक्ष शंतनु जोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी अकोला शिक्षणाधिकारी पवार सर अर्बन बँक राजन सोनटक्के, शरदजी कोकाटे यांची टिम तसेच ,ढोणे महाविद्यालय सौ.नागापुरे मॅडम व चमु मनपा उपायुक्त विजय परतवार,झोन अधिकारी राजेश सरफ,गजानन नारे,अशोक ढोरे, प्रमोद देंडवे, तसेच प्रमुख आयोजक निलेश देव आणि जयंत सरदेशपांडे, स्नेहा गोखले, अजय शास्त्री, कुशल सेनाड,अमृता सेनाड सौ.पल्लवी कुळकर्णी यांची उपस्थिती होती. गणेशमूर्ती साकारण्यासाठी शरद कोकाटे यांनी केलेले उत्कृष्ट मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांकडून घडविलेल्या गणेशमूर्ती निश्चितच समाजाला नवी दिशा देणाऱ्या ठरल्या.





एकदंत, विघ्नहर्ता, सिद्धिविनायक, गजानन या नावांचे स्मरण करत विद्यार्थ्यांनी मूर्तीरचना केली. शाडू मातीपासून घडवलेल्या मूर्ती म्हणजे भक्ती आणि प्रकृतीचे पावन मिलन आहे. निसर्गाला इजा न होता बाप्पाचे स्वागत करण्याचा संकल्प या उपक्रमातून प्रत्येक विद्यार्थ्याने दृढ केला. या उपक्रमाने अकोल्यातून ‘गणराया माझ्या घरी ये, पण प्रदूषणाचा भार मातृभूमीवर करू नको’ असा संदेश दुमदुमला. या अनोख्या उपक्रमाने आगामी गणेशोत्सवासाठी अकोल्यातून एक आध्यात्मिक, भक्तीपूर्ण आणि पर्यावरणपूरक संदेश संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश देव यांनी केले, तर सूत्रसंचालन रश्मी देव यांनी केले. उद्या सकाळी रोजगार मेळावा व संध्याकाळी मंजुषा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन हे जठारपेठ स्थित भारत विद्यालयासमोरच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात होणार आहे.

## जिल्हाधिकारी निवासस्थानी ध्वजारोहण उत्साहात साजरा



**अकोला :** जिल्हाधिकारी निवासस्थानी स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते आज झाले.यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत व राष्ट्रध्वजाला वंदन करण्यात आले. देशासाठी प्राण त्यागणा–या हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध बालगृहांतील बालकांना जिल्हाधिका–यांच्या हस्ते मिठाईचे वाटप करण्यात आले.जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, बालसंरक्षण अधिकारी सुनील लाडुलकर, विविध बालगृहांतील बालके, पोलीस कर्मचारी आदी उपस्थित होते.

## अकोला पोलीस दला तर्फे मिशन उडान अंतर्गत ‘रन फॉर ड्रग्स फ्री इंडिया‘ मॅरेथॉन चे आयोजन ०५ हजार नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद!

**■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :**

देशासमोरील सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षिततेच्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणजे ड्रग्जचा गैरवापर तसेच अंमलबजावणी आणि पुनर्वसन प्रयत्न महत्वावी भुमिका बजावत असतांना, जागरूकता वाढवुन धारणा बदलुन आणि समुदायांना कृती करण्यास समक्ष करून ड्रग्जचा गैरवापर रोखण्या साठी जनजागृती मोठ्या प्रमाणात करण्याचे मा. केंद्रीय गृहमंत्री यांचे निर्देशानुसार अंमली पदार्थाच्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी आणि अंमली पदार्थ नियंत्रणसाठी देशव्यापी अंमली पदार्थ जागरूकता मोहीम राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे मा. पोलीस अधीक्षक श्री अर्चित चांडक यांचे मार्गदर्शना खाली ‘रन फॉर ड्रग्ज फी इंडीया‘ या अंमली पदार्थ जनजागृती मोहीमे अंतर्गत अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे ०३ की मी मॅरेथॉन चे आयोजन दि १६.०८.२०२५ रोजी सकाळी ०६.३० या पोलीस मुख्यालय या ठीकाणी करण्यात आले होते.मॅरेथॉन करीता मा. श्री अनुपजी धोत्रे खासदार, यांची विशेष उपस्थिती, होती मा. जिल्हाधिकारी अजित कुंभार, मा. संजय लहाने मनपा आयुक्त अकोला यांची प्रमुख उपस्थिती होती.



मान्यवरानी यांनी मॅरेथॉन ला हिरवी झेंडी दाखवून सुरवात करण्यात केली. मॅरेथॉन चा मार्ग पोलीस मुख्यालय, सरकारी बगीचा, कलेक्टर ऑफीस, अशोक वाटीका, सिंधी कॅम्प चौक, निमवाडी पोलीस लाईन, लक्झरी बस स्टॅण्ड व पोलीस मुख्यालय येथे समारोप झाला सदरची मॅरेथॉन ही सर्वाकरीता खुली होती सर्व जिल्हयातील ०५ हजार नागरीकांनी या मॅरेथॉन मध्ये सहभाग नोंदवीला, मॅरेथॉन दरम्यान मॅरेथॉन सदस्य यांचे करीता चिअर्स स्टेज लावण्यात आले होते.

## तिरंगा यात्रा काढून देशाच्या वीर शहीद जवानांना भाजप व युवा मोर्चा तर्फे आदरांजली



**■तेल्हारा,दि १६ (प्रतिनिधी) :**

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट तेल्हारा येथे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा व तेल्हारा मंडळ द्वारे भारतीय जनता पार्टीच्या कार्यालय शेगाव नाका ते टॉवर चौक तेल्हारा येथे जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते पदाधिकारी व तेल्हारा मंडळातील सर्व ज्येष्ठ पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रा व देशाच्या वीर शहिदांना आदरांजली अर्पण करण्यात आली या तिरंगा यात्रेचा समारोप टावर चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्पगुच्छ अर्पण करून या तिरंगा यात्रेचा समारोप करण्यात आला तिरंगा यात्रा संपन्न करण्यासाठी योगेश गोतमारे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष, गजानन उंबरकर जिल्हा उपाध्यक्ष भाजपा, जयश्रीताई फुंडकर जिल्हाध्यक्ष महिला मोर्चा, गजाननराव नळकांडे प्रदेश राज्य कार्यकारिणी सदस्य, डॉ.बाबुराव शेळके माजी जिल्हा सरचिटणीस आदि उपस्थित होते.

## लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठ व ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अकोट :** लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठ व ज्यु. कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिनाचा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने संस्थेचे अध्यक्ष माननीय रमेश रावजी हिंगणकर, सचिव माननीय भरतजी पेठे, सहसचिव माननीय विठ्ठल दास जी मोहता, कोषाध्यक्ष माननीय कुंजीलालजी कोठारी, प्राचार्य शामकुमार जी शर्मा, बचपन विभागाच्या प्राचार्य सौ.कोमल मनी मॅडम ह्या हजर होत्या

सर्वप्रथम बँड पथकाच्या गजरामध्ये सर्व प्रमुख अतिथींना मुख्य प्रवेशद्वारापासून सभास्थळापर्यंत आणण्यात आले स्वागत दारावर वर्ग दहावी च्या विद्यार्थिनींनी कुम कुम तिलक लावून सर्व मान्यवरांचे स्वागत केले. मंचावर सर्वांचे आगमन झाल्यावर मा.सरस्वती, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले अध्यक्ष रमेश रावजी हिंगणकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले ध्वजाला सलामी देण्यात आली व राष्ट्रगीताचे व ध्वजगीताचे गायन




करण्यात आले त्यानंतर सर्व अतिथींचे शिक्षकांच्या हस्ते स्वागत करण्यात आले याप्रसंगी दोन पोलीस अधिकाऱ्यांचे आगमन झाले व पोलीस दल अकोला द्वारे निर्देशित नशा व ड्रग यांच्या विरोधी शपथ सर्व मुलांना देण्यात आली पोलीस अधिकारी व इंडियन आर्मीच्या दोन जवानांचे स्वागत करण्यात आले त्यानंतर रंग संस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली बचपन पासून ते बारावी पर्यंत च्या सर्व विद्यार्थ्यांनी नृत्य गीत गायन नाट्य भाषण कला सादर केली यावेळी विदेशी हटाव और स्वदेशी अपनाव हा नारा देण्यात आला कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पालक वर्ग विद्यार्थी ,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी हजर होते कार्यक्रमाची तयारी व इतर व्यवस्था सौ चित्रा काळे मॅडम ,आकाश गोरले ,रवी टिकार, अमोल फुले, व उर्वरित सर्व शिक्षकांनी सामूहिक रित्या केली.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकावर स्वातंत्र्य दिन उत्सव

**मुर्तिजापूर :** शहरातील स्टेशन विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती स्मारकाजवळ १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता स्वातंत्र्य दिनाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा समिती मुर्तिजापूर, भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा व शहर शाखा, वंचित बहुजन आघाडी, समता सैनिक दल, माजी सैनिक संघटना मुर्तिजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय ध्वजवंदनाने झाली. उपस्थित मान्यवरांनी संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्य मिळिवण्यासाठी झालेल्या बलिदानाची आठवण करून दिली. त्यांनी स्वातंत्र्य, समानता व बंधुतेच्या मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले.



### ऑल इंडिया रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन च्या वतीने स्वातंत्र्यदिवस आनंद उत्साहात साजरा




**अकोला:** ऑल इंडिया डउ/डढ रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन नांदेड डिव्हिजन येथील मुख्य शाखा अंतर्गत ‘ ब्लू हाऊस‘ प्लॅटफफॉर्म नंबर ४ येथे स्वातंत्र्य दिन दिवस मोठ्या आनंद उत्साहात साजरा करून प्रकाश बोदोडे डिव्हीजनल सेक्रेटरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाला मुख्य प्रमुख उपस्थिती म्हणून रमेश नरसीमल्लू ,( सहाय्यक मंडल सचिव) महेंद्र डेगरवार ( मंडल कोषाध्यक्ष नांदेड) अशोककुमार मीना, (नांदेड शाखा सचिव,) प्रेम कुमार मीना (हेल्थ इन्स्पेक्टर नांदेड)संजिवकुमार (चीफ कमर्शियल इन्स्पेक्टर,रेल्वे) बनेसिंग मीना, मोहनलाल मीना, विनायक जांमळेकर, नामदेव मल्हारी, पार्थ ब्रह्मे, राहुल थोरात, धम्मा मोरे, रामचंद्र खंडारे, चंद्रकांत सातोरे, राहुल कांबळे, मनोहर बहादुरे, बलराम यादव, संतोष देशपांडे, शिवप्रसाद, रामभाऊ पुंडगे, व्यंकटेश रेखावार, चंद्रशेख स्वामी, शेकडो रेल्वे कर्मचारि कार्यक्रमाला उपस्थित होते.

# जिल्हा परिषदमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अकोला:** दिनांक १६ ऑगस्ट मम भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ वा स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेच्या प्रांगणात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अनिता मेश्राम यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी माया शिर्के, शिक्षणाधिकारी प्राथमिक रतनसिंग पवार, कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख आणि कर्मचारी यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अनिता मेश्राम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सलामी देण्यात आली . राष्ट्रगीता नंतर महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळा क्रमांक २ मलकापूरच्या स्काऊट गाईड पथकाने पथसंचलन करीत उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. महाराष्ट्र माध्यमिक शाळा अकोला च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले.यावेळी जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली. सोबतच स्काऊट गाईडच्या राष्ट्रीय स्तरावरील ‘सुवर्ण तीर‘ या पुरस्कार प्राप्त अक्षरा सम्राट कांबळे व सृष्टी मंगेश नरवाडे या विद्यार्थिनींचा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाल सुरे यांनी केले.या कार्यक्रमासाठी विस्तार अधिकारी शिक्षण अरविंद जाधव, शिक्षिका शालिनी तायडे, सहाय्यक शिक्षक अब्दुल अबीद, लिपिक धनराज वानखडे आदींनी परिश्रम घेतले.



## शिवसेना वसाहत येथे स्वातंत्र्य दिन साजरा



**अकोला :** स्थानिक शिवसेना वसाहत येथे ७९ वा स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला कार्यक्रमाला आपला माणूस डॉ अशोक ओळंबे नगरसेवक गजानन चव्हाण डॉ संजय ढोरे वैशाली दीदी रुपाली दीदी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला कार्यक्रमाचे आयोजन गेली २९ वर्षापासून समाजसेवक गणेश पोलाखडे व त्यांचे पुत्र सागर पोलाखडे यांच्या वतीने करण्यात येत असते ७९ व्या स्वातंत्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमश्रमध्ये भारत माता पूजन करून झेंडा वंदन प्रजापिता ब्रह्मकुमारी च्या वैशाली दीदी व आपला माणूस डॉ अशोक ओळंबे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाला गणेश मानकर संतोष चाटी नगरसेवक गजानन चव्हाण डॉ मधुकर सोनारगण संतोष काटे डॉ संजय ढोरे श्री तिवारी राजूभाऊ संतोष पोंधे सोनू भाऊ डांगे एकनाथ ढवळे संतोष राऊत कृष्णा महाजन रामभाऊ लढाळ शाहू महाराज मदनकर काका धनंजय बुलकडे मयूर सुलताने धनगर काका मनीष अग्निहोत्री आदि उपस्थित होते.


RNINO-46973/1986 महासागर अकोला

मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१–८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# बालांगण



## सैर धोकादायक विमानतळांची

छोट्यांनो, तुम्ही विमानप्रवास केला आहे का? विमान आकाशात भरारी घेत असताना आणि धावपट्टीवर उतरत असताना मनात थोडी धाकधूक असते. जगभरातल्या सुंदर, गजबजलेल्या विमानतळांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. पण काही विमानतळ खूपच धोकादायक आहेत. इथे विमान उतरवताना पायलटचं कौशल्यं पणाला लागतं. चला तर मग, अशाच काही धोकादायक विमानतळांची माहिती घेऊ.

✔ कॅरेबियन बेटांवरच्या 'सबा आयलंड' येथील विमानतळाची धावपट्टी खूपच लहान आहे. फक्त १३०० फूट लांबीच्या धावपट्टीवर विमान उतरवावं लागतं. या धावपट्टीजवळच उतार आहे. या उताराच्या पुढे थेट समुद्र आहे. याच कारणामुळे हा विमानतळ खूप धोकादायक आहे.

✔ तिबेटमधला 'क्यामडो बामडा' विमानतळ जगातला सर्वात उंचीवरचा विमानतळ आहे. हा विमानतळ जवळपास १४ हजार फूट उंचीवर वसला आहे. या विमानतळावरच्या धावपट्टीची लांबी ३.५ मैल आहे. इथे विमान उतरवण्यासाठी पायलटला बरीच कसरत करावी लागते.

✔ अंटार्टिका खंड बर्फाने आच्छादलेला असतो. इथे 'आईस रन वे' आहे. या 'रन वे'वर नेहमी बर्फ पडलेला असतो. बर्फ पडलेल्या रन वेवर विमान उतरवणं किती कठीण असेल याची आपण कल्पनाच करू शकतो. इथल्या बर्फात विमानाचं चाक रुतू नये याची काळजी पायलटला घ्यावी लागते. अंटार्टिकावर बरंच संशोधन सुरू असतं. त्यासाठी संशोधकांना घेऊन येणारं विमान या 'आईस रन वे'वर उतरतं.



ॲडव्हेंचरस...

✔ नेपाळमधला 'तेंझिंग–हिलरी' विमानतळ असाच अनोखा आहे. जगातलं सर्वात उंच असं 'माउंट एव्हरेस्ट' शिखर सर करण्यासाठी बरेच गिर्यारोहक नेपाळमध्ये येतात. हे गिर्यारोहक याच विमानतळावर उतरतात. हा विमानतळ त्यांच्या स्वागतासाठी सज्ज असतो. या भागात जोरदार वारे वाहत असतात. तसंच भरपूर धुकंही असतं. यामुळे हा विमानतळ बराच धोकादायक ठरतो.

✔ जिब्राल्टरच्या विमानतळाबद्दल ऐकल्यावर तुम्हाला धक्काच बसेल. या विमानतळावर सतत वर्दळ असते. हा विमानतळ इथल्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागी आहे. विमानाचं उड्डाण होत असताना तसंच विमान उतरत असताना रस्त्यावरची वाहतूक थांबवली जाते. असं असूनही आजवर इथे मोठा अपघात झालेला नाही. रस्त्याच्या मध्यभागी असणारा हा विमानतळ अनोखाच म्हटला पाहिजे.

## वाघोबा असतात असे

मित्रांनो, अलिकडेच आपण आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा केला. या दिवशी वाघांच्या संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण केली जाते. तुम्हीही वाघांशी संबंधित काही मनोरंजक गोष्टी ऐकल्या असतील. चला, आज त्यात आणखी भर घालू या.

तुम्हाला माहिती आहे का, प्रत्येक वाघाच्या अंगावरील पट्टे आपल्या बोटांच्या ठशांसारखे वेगळे असतात? होय... मुलांनो, कोणत्याही दोन वाघांच्या शरीरावर एकसारखेच पट्टे नसतात. म्हणूनच याच्या मदतीने वेगवेगळे वाघ ओळखले जातात.



अंगावरील पट्टे केवळ वेगळी ओळखच निर्माण करत नाहीत तर जंगलात लपण्यासही त्यांना मदत करतात.

जगात सर्वाधिक वाघ भारतात आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मते, भारतात वाघांची संख्या सुमारे २,९६७ आहे.


वाघांचे कान खूप संवेदनशील असतात. ते केवळ आवाज ऐकू शकत नाहीत तर एकमेकांशी संवादही साधू शकतात. वाघीण पिल्लांशी संवाद साधण्यासाठी कानामागील पांढऱ्या डागांचा वापर करते. ती कानांद्वारे धोक्याचा संकेत देखील देते. कोणत्याही प्रकारचा धोका जाणवल्यास वाघीण कान चपटे करून संकेत देते.

वाचा तर खरं

वाघ एका वेळी १८ ते २० किलो मांस खाऊ शकतात. एखादी मोठी शिकार मिळाली तर ते आठवडाभर पुन्हा शिकार करत नाहीत. हा त्यांच्या शरीराच्या नैसर्गिक अनुकूलन क्षमतेचा एक भाग आहे. वाघ पोटभर जेवला तर नंतर सुमारे ३० तास झोपतो.

वाघ अनेक प्रकारचे आवाज काढतात. ते गुरगुरतात, फुसफुसतात आणि म्याऊसारखे आवाज देखील काढू शकतात. ते या आवाजांचा वापर संवाद साधण्यासाठी, मेटिंगसाठी आणि आपला प्रदेश चिन्हांकित करण्यासाठी करतात. पण असे हे देखणे वन्यजीव सध्या संकटात आहेत. दर आठवड्याला सरासरी दोन वाघांची तस्करांकडून सुटका केली जाते. वाघांच्या अवयवांची तस्करी हा आशियामध्ये एक मोठा काळा बाजार आहे. यामध्ये त्यांच्या शरीराचे अवयव पारंपरिक औषधांमध्ये वापरले जातात. बाजारात विकले जातात. त्यामुळेच पृथ्वीवर सुमारे २० लाख वर्षांपासून अस्तित्वात असणाऱ्या या प्रजातीचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. ती ओळखायला हवी

ठिपके जुळवा



## नौदलाविषयी थोडंसं...


मित्रमैत्रिणींनो, लष्कर, हवाई दलाप्रमाणेच नौदलही आपल्या संरक्षणासाठी सज्ज असतं. समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रुला रोखण्याचं काम नौदलाकडे असतं. शत्रूदेशाची प्रमुख बंदरं तसंच नौदलाचे तळ उद्ध्वस्त करण्याची जबाबदारीही नौदलाकडे असते. आपलं भारतीय नौदलही खूप सक्षम आहे. १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झालं होतं. या युद्धात भारतीय नौदलाने खूप मोठी कामगिरी पार पाडली होती. भारताने या युद्धात विजय मिळवला होता. या विजयाची आठवण म्हणून चार डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय नौदल जगातलं सातव्या क्रमांकाचं सर्वात मोठं नौदल आहे.

आपल्या नौदलाची गणना जगातल्या दहा सक्षम नौदलांमध्ये होते. केरळमध्ये इंडियन नेव्हल अकादमी असून ही आशिया खंडातली पहिल्या क्रमांकाची नौदल अकादमी आहे.

जनरल नॉलेज

भारताच्या नौदलाचा इतिहास खूप जुना आहे. मारकॉस किंवा मरीन कमांडोज हे नौदलाचे अत्यंत कुशल अधिकारी समजले जातात. या कमांडोंना सर्वात आव्हानात्मक मोहिमांवर पाठवलं जातं. हे कमांडो वेशांतर करून सर्वसामान्य नागरिकांमध्ये मिसळतात आणि आपली मोहीम फत्ते करून येतात. 'शं नो वरुण:' हे आपल्या नौसेनेचं घोषवाक्य आहे. आपलं नौदल सुसज्ज आहे. नौदलाकडे अत्यंत शक्तिशाली युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुड्या आहेत. २५० पेक्षा अधिक लढाऊ विमानंही आहेत. नौदलात ६७ हजार अधिकारी कार्यरत आहेत.





## कुत्रे वाहनामागे का धावतात?



छोट्या दोस्तांनो, रस्त्यावर शांत बसलेला कुत्रा अचानक एखाद्या चालत्या बाईक किंवा कारच्या मागे धावताना तुम्ही बघितले असेल. तो फक्त धावतच नाही तर जोरात भुंकतो. पण हे का घडते याचा कधी विचार केला आहे का? कुत्र्याची वास घेण्याची क्षमता माणसांपेक्षा खूप शक्तिशाली असते. ते दुरूनही वास घेऊ शकतात. वाहन दुसऱ्या ठिकाणाहून येते तेव्हा तिथे असणाऱ्या कुत्र्यांचा वास टायरला चिकटतो. वाहन नवीन परिसरात पोहोचताच स्थानिक कुत्रे टायरवरील वेगळ्या जागेचा वास बरोबर ओळखतात. त्यांच्यासाठी हा बाहेरील कुत्र्याने त्यांच्या परिसरात प्रवेश केल्याचा इशारा असतो. म्हणूनच ते लगेच सावध होतात आणि वाहनाचा पाठलाग करू लागतात. असे करुन जणू ते आपल्या सीमेचे रक्षण करत असतात. कुत्रे सहसा वाहनांच्या टायरवर लघवी करतात. हा योगायोग नाही तर हीदेखील त्यांची विशेष भाषा असते. इथे कोणी येऊ नये, हे सांगण्याचा त्यांचा हा प्रयन असतो. कुत्रे अत्यंत संवेदनशील असतात. एखाद्या वाहनाने त्यांच्या साथीदाराला दुखापत केली असेल किंवा त्याला अपघातात मारले असेल तर ते अशा वाहनाला ओळखू शकतात. पुढच्या वेळी ते वाहन दिसते तेव्हा ते कदाचित बदला घेण्यासाठी किंवा रागाच्या भरातही त्या वाहनाचा पाठलाग करतात. कुत्रे सहसा स्थिर वस्तूंकडे दुर्लक्ष करतात, परंतु वेगाने चालणारी किंवा धावणारी कोणतीही गोष्ट त्यांच्यासाठी आव्हान वाटते. शिकारी स्वभावामुळे ते वेगाने चालणाऱ्या वस्तूंचा पाठलाग करू लागतात. म्हणूनच ते चालणाऱ्या माणसांना त्रास देत नाहीत पण दुचाकी किंवा कारचा आवाज आणि वेग त्यामुळे सावध होऊन स्वत:च्या रक्षणाला सिद्ध होतात.

माहिती असावे


## 'एचएस कोड' म्हणजे काय?

दोस्तांनो, खादी या कापडाबद्दल तुम्ही ऐकलं असेल. खादीचे कुर्ते, साड्या, ड्रेस, शर्ट मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. खादी म्हणजे भारताची शान. केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने या खादीला 'एचएस कोड' दिला आहे. एचएस कोड म्हणजे नेमकं काय? जाणून घेऊ.

एचएस कोड म्हणजे 'हॉर्मोनाइज्ड सिस्टीम कोड'. हा आंतरराष्ट्रीय कोड आहे. खादीची मागणी, विक्री, खरेदी, निर्मिती आणि प्रसिद्धी वाढवण्यासाठी तसंच जगभरात नवी ओळख निर्माण करण्यासाठी सरकारने हा कोड दिला आहे. एचएस कोड म्हणजे सहा आकडी क्रमांक. 'वर्ल्ड कस्टम ऑर्गनायजेशन' म्हणजे डब्ल्यूसीओकडून अशा प्रकारच्या कोडची निर्मिती केली जाते.

जाणून घ्या

उत्पादनाला परदेशात किती मागणी आहे, उत्पादनाचा किती वापर होतो हे एचएस कोडमुळे कळू शकतं. आज २०० पेक्षा जास्त देश आंतरराष्ट्रीय व्यापारसाठी तसंच जास्तीत जास्त माहिती मिळवण्यासाठी या डाटाचा वापर करतात. सरकारी आणि खाजगी कंपन्या तसंच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून एचएस कोडचा वापर केला जातो.




## नृत्याची आवड असेल तर...

मुलांनो, तुम्हाला नाचायला आवडतं का? तुमच्या नाचाचं कौतुक होतं का? तुम्ही डान्स क्लासला जाता का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं 'हो' असतील तर तुम्ही नृत्यातही करिअर करू शकता. कथक, भरतनाट्यम, कुचिपुडी, ओडिसी हे शास्त्रीय नृत्याचे प्रकार आहेत. ही नृत्यं शिकण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागते. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर तुम्ही शास्त्रीय नृत्यात निपुण होता. यासोबतच पाश्चात्य नृत्य, चित्रपटांवरच्या गाण्यांवरचं नृत्य, झुंबा डान्स असे प्रकारही प्रचलित आहेत. यासोबतच विविध प्रांतांची लोकनृत्यही आहेत.

नृत्यकलेचा समावेश परफॉर्मिंग आर्टसमध्ये होतो. नृत्यकलेत प्राविण्य मिळवण्यासाठी तुम्हाला संगीताची आवड असायला हवी. ताल, सूर, ठेका यांची जाण असायला हवी. नृत्याप्रती झपाटलेपण हवं. नृत्यावर आधारित रिॲलिटी शोजमुळे आज अनेकांना व्यासपीठ मिळू लागलं आहे. नृत्यकलेच्या आवडीच्या बळावर या क्षेत्रात करिअर करता येईल. मात्र प्रशिक्षण तसंच पदवीमुळे तुम्हाला बऱ्याच संधी खुल्या होतील. विविध संस्था नृत्याचं प्रशिक्षण देतात. नृत्याचं प्रशिक्षण घेऊन तुम्ही पुढे जाऊ शकता. विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकता. पुरेशा अनुभवानंतर स्वत:ची प्रशिक्षण संस्थाही काढू शकता.

कोण होणार?



## चित्ता नव्हे, रोबो...

जगभरातच विविध प्रकारचे रोबो बनवले जात आहेत. अमेरिकेतल्या एका संशोधन संस्थेने चार पायांचा रोबो तयार केला आहे. या अनोख्या रोबोविषयी...

अमेरिकेतल्या कॅंब्रिजमधल्या मॅसॅच्युसेट्स इस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने चार पायांचा रोबो तयार केला आहे. हा रोबो चित्त्यासारखा दिसतो. याच कारणामुळे त्याला मिनी चित्ता रोबो हेच नाव देण्यात आलं आहे. मिनी चित्ता रोबो रिमोटवर चालतो. हा रोबो एका सेकंदात ३० ॲक्टिव्हिटी करू शकतो. गंमत म्हणजे तो फुटबॉलही खेळतो.

टेक फन

तोल गेल्यावरही हा रोबो स्वत:ला सावरू शकतो. तो लगेच धावण्याच्या स्थितीत येतो. चित्ता, वाघ, मांजरासारखे प्राणी दबक्या पावलांनी येतात. चित्ता रोबोही अशाच प्रकारे दबक्या पावलांनी चालू शकतो. या रोबोला जगातल्या चित्ता या सर्वात वेगवान प्राण्याचा वेग गाठता आलेला नाही. चित्ता १२० किलोमीटर प्रति तास एवढ्या वेगाने धावू शकतो. पण चित्ता रोबोची गती फक्त १४ किलोमीटर प्रति तास एवढीच आहे.

मॅसाच्युसेट्स इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतले प्राध्यापक सेंगबाई किम यांच्या पुढाकाराने हा मिनी चित्ता रोबो तयार करण्यात आला आहे. किम यांना चित्ता हा प्राणी खूप आवडतो. त्यांनी यू ट्यूबवर चित्त्याचे बरेच व्हिडिओ बधितले. यामुळे त्यांना या रोबोची कल्पना सुचली.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) केरळची राजधानी कोणती?
२) आयपॉड तयार करणारी कंपनी कोणती?
३) चव, गंध आणि रंग नसलेला वायू कोणता?
४) इंग्लंडची राजधानी कोणती?
५) हृदय आणि फुफ्फुसाचं संरक्षण करणाऱ्या हाडांना काय म्हणतात?
६) परदेशात जाण्यासाठी कोणत्या कागदपत्राची आवश्यकता असते?
७) कोणत्या कापडाला कृत्रिम रेशीम असं म्हटलं जातं?
८) नेल पॉलिश रिमूव्हरमध्ये काय असतं?
९) ब्लिचिंग पावडरमध्ये कोणता घटक असतो?
१०) धुण्याच्या सोड्याचं शास्त्रीय नाव काय?

उत्तर : १) थिरुअनंतपुरम २) ॲपल ३) ऑक्सिजन ४) लंडन ५) बरगड्या ६) पासपोर्ट ७) रेयॉन ८) ॲसिटोन ९) क्लोरिन १०) सोडियम कार्बोनेट

### दोस्त हे मस्त

#### असे हे पक्षी



दोस्तांनो, पक्ष्यांचं जगही अनोखं असतं. आता घुबडाचंच बघा. मागे बघण्यासाठी घुबडाला अंग हलवावं लागत नाही. फक्त मान वळवून तो मागे बघू शकतो. हमिंगबर्ड मागच्या दिशेनेही उडू शकतो. गिधाड सर्वात उंच उडणारा पक्षी आहे. हा पक्षी जवळपास ११,२०० मीटर उंचीवरून उडू शकतो. वूड डकचे पंख रंगीत असतात. नर वूड डकच्या अंगावर पांढरे ठिपके असतात. तसंच त्यांचे डोळे लाल असतात. मादी वूड डकचे डोळे पांढरे आणि शरीर करड्या रंगाचं असतं.

### खादाडी

#### मस्त मोजरेला टोस्ट

मुलांनो, संध्याकाळी मोजरेला टोस्ट बनवून खाता येईल. यासाठी एक क्रस्ट ब्रेड, तीन चमचे बटर, एक चमचा ठेचलेला लसूण, अर्धा चमचा मिरपूड, कांद्याची चिरलेली पात, मोजरेला चीज आणि मीठ हे साहित्य घ्या. ब्रेडचे एक इंच आकाराचे तुकडे करून घ्या. यानंतर ब्रेडची एक बाजू भाजून घ्या. न भाजलेल्या भागवर बटर लावा आणि त्यावर मोजरेला चीज क्यूब किंवा स्लाईस ठेवा. त्यावर मिरपूड, मीठ आणि थोडी कांद्याची पात घाला. आता चीज वितळेपर्यंत मायक्रोवेव्हमध्ये ब्रेड बेक करून घ्या. सॉससोबत गरमागरम खा.



### स्टडी टिप्स

#### उगाच पाठांतर करू नका

छोट्यांनो, तुम्ही एकाच विषयाचं सतत पाठांतर करता का, महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करता का, यामुळे अभ्यास चांगला होतो, बऱ्याच गोष्टी आपल्या लक्षात राहतात असं तुम्हाला वाटतं का? प्रत्यक्षात अभ्यासाची ही पद्धत चुकीची आहे. अशा पद्धतीने अभ्यास करून काहीच साध्य होत नाही. उलट वेळ वाया जातो. अभ्यास नीट लक्षातही रहात नाही. त्यामुळे सतत एकाच विषयाचा अभ्यास करत बसू नका. विविध विषयांना वेळ वाटून द्या.



### योगा टाईम

#### दृष्टी सुधारा

मुलांनो, मोबाईल आणि कॉम्प्युटरमुळे कमी वयात चष्मा लागतो. लहानग्या मुलांनाही आता चष्मा लागू लागला आहे. दृष्टी सुधारण्यासाठी तुम्ही योगासनं करू शकता. सर्वात आधी मांडी घालून बसा. हळूहळू श्वास घेत रहा. डोळे वर, खाली, डावीकडे आणि उजवीकडे फिरवा. मान सरळ ठेवा. मग मानही सगळ्या बाजूंनी फिरवा. या आसनामुळे डोळ्यांना आराम मिळेल.



# अधिक समृद्ध, सुरक्षित आणि विकसित नागपूर घडवूया

## विभागीय आयुक्त कार्यालयात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सर्वच क्षेत्रात वेगाने विकासकामे सुरू आहेत. आरोग्य, शिक्षण, रोजगार या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०४७ पर्यंतचा विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यात नागपूर जिल्ह्याचे योगदानही मोलाचे ठरणार आहे. प्रशासन लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या सहकार्याने विकसित भारतासाठी योगदान देण्याची गरज आहे. सर्वांनी मिळून अधिक समृद्ध, सुरक्षित आणि विकसित नागपूर घडवून विकसित भारतासाठी योगदान देण्याचे आवाहन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.

भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, अतिरीक्त आयुक्त माधवी चवरे-खोडे, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, महानगरपालिका आयुक्त अभिजीत चौधरी,



नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मीना, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस सह आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

फाळणीच्या वेदना सोबत घेऊन आपल्या पूर्वजांनी स्वातंत्र्याच्या भवितव्याकडे पाहिले. मोठा विश्वास व अपेक्षा त्यांनी शासनाकडून बाळगल्या. भारतीय स्वातंत्र्यापासून आजवरच्या टप्प्यातील अनेक स्थित्यंतरे आपण अनुभवली. गत एक तपापासून नागरिकांच्या अपेक्षांची ध्येयपूर्ती अधिक वेगाने होत असून विविध विकास योजनांच्या माध्यमातून भारताने जागतिक पातळीवर मोठे यश संपादन केल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक घटकातील व्यक्तीला विविध विकास योजनांच्या माध्यमातून प्रगती पथावर आणण्याचे ध्येय महाराष्ट्र शासनाने निश्चित केले आहे. या ध्येयानुसार ग्रामीण भागासह महानगरापर्यंत नागरिक उत्तम प्रशासनाची अनुभूती घेत असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी सांगितले.

पोलीस विभाग हा राज्याचा सर्वात महत्त्वाचा विभाग आहे. शहराला सुरक्षित ठेवण्यात पोलिसांची मोलाची भूमिका असते. पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांच्या नेतृत्वात गरुडदृष्टी या उपक्रमाच्या माध्यमातून लक्षणीय काम झाले आहे. समाज विघातक, द्वेष निर्माण करणाऱ्या पोस्ट विविध माध्यमांवर आल्यास त्याला तत्काळ शोधून कारवाई करणे आता शक्य झाले आहे. मजबूत सुरक्षा व्यवस्था उभे करण्याचे काम नागपूर शहर पोलीस दलाने केले आहे. ऑपरेशन थंडर, ऑपरेशन शक्ती, ऑपरेशन यु टर्न या अभियानाच्या माध्यमातून पोलीस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल यांनी केलेल्या कामाचे कौतुक पालकमंत्री बावनकुळे यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर शहर पोलीस सक्षमीकरणासाठी एका नव्या झोनची निर्मिती केली आहे. त्यातून नागरिकांच्या सुरक्षितते सह पोलीस दलाला मनुष्यबळ मिळण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले. नागपूर शहर सीसीटीव्हीखाली आणण्याचा पूर्णपणे प्रयत्न होत आहे. ग्रामीण पोलीस विभागाने सावनेर शहरात पहिली एआय आधारित सीसीटीव्ही यंत्रणा सुरू केली याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार यांचे त्यांनी जाहीर कौतुक केले. याच आधारावर नागपूर शहरातही शहरभर सीसीटीव्हीचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे बावनकुळे यावेळी म्हणाले.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांचेही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कौतुक केले. विभाग तसेच जिल्हा स्तरावर विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासावरही भर देण्यात येत आहे. यासाठी प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी प्रयत्नरत आहेत. जिल्हा परिषदेमार्फत अधिकाऱ्यांनी गावात जाऊन विविध योजनांची माहिती देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. महानगरपालिकेचेही चांगले काम आहे. सर्वांसाठी घरे हे मुख्यमंत्र्यांचे उद्दिष्ट आहे. यात महानगरपालिकेने पुढाकार घेतला असून राज्यात सर्वात जास्त काम नागपूर महानगरपालिकेत झाले आहे. बस, आरोग्य, शिक्षण सेवा यावर खऱ्या अर्थाने मोठे काम झाले असल्याचे ते म्हणाले.

# मत चोरीच्या विरोधात

## काँग्रेस पक्षातर्फे कॅण्डल मार्च

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. १६ :

येथे काँग्रेस पक्षातर्फे "मतदान चोर, खुर्ची छोड" या बॅनर अंतर्गत माजी मंत्री सुनील केदार यांच्या नेतृत्वात भव्य कॅन्डल मार्च आयोजन करण्यात आलेले होते. लोकसभेचे विरोधी पक्ष नेते व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांनी मागील निवडणुकीमध्ये मतदार यादीमध्ये झालेल्या घोळाचा पर्दाफाश केला. त्याच्या निषेध म्हणून या कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी प्रामुख्याने माजी मंत्री सुनील केदार, खासदार श्यामकुमार बर्वे, प्रदेश काँग्रेसच्या कुंदा राऊत, माझी सभापती अवंतिका लेकुरवाळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकडे, जिल्हा काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष अश्विन बैस, कळमेश्वर काँग्रेसचे अध्यक्ष अशोक भागवत, बाजार समिती सभापती बाबाराव पाटील, खरेदी विक्री अध्यक्ष बाबाराव कोढे, पंचायत समितीचे माजी सभापती श्रावणदादा भिंगारे, वैभव घोंगे, विभा निंबुळकर, माजी उपसभापती नरेंद्र पालटकर जिल्हा बँकेचे माजी संचालक किशोर




मोहोड, कळमेश्वर काँग्रेसचे माजी नगरसेवक संजय धोंगडी, राजेंद्र सुके, मोहपा नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष माधव चर्जन, माजी सरपंच राजेंद्र जिचकार व तालुक्यातील ग्रामपंचायतचे सरपंच, काँग्रेस व महिला काँग्रेसचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जमिनीच्या मोबदल्यासाठी शेतकऱ्याची जलसमाधी

## आंदोलन सुरू असतानाच पाण्यात मारली उडी

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. १६ :

बुलढाणा जिल्ह्यात जिगाव प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी शेतकऱ्यांचे गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन सुरू होते. मात्र याच आंदोलनादरम्यान स्वातंत्र्यदिनी विनोद पवार या शेतकऱ्याने थेट पाण्यात उडी मारून जलसमाधी घेतली. त्यामुळे प्रशासनाच्या दिरंगाईमुळे एका शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागला आहे. या प्रकरणावरून विरोधकांनी देखील राज्य सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी ही अतिशय दुःखद, लज्जास्पद आणि संतापजनक घटना असल्याचे म्हटले आहे. तर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी प्रकरणावरून सरकारवर निशाणा साधला आहे. या प्रकरणी जलसमाधी घेणाऱ्या विनोद पवार यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत करण्याची मागणी देखील रोहित पवार यांनी



केली आहे. आता तरी सरकारला जाग येणार का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, एकीकडं देश स्वातंत्र्यदिन साजरा करत असताना दुसरीकडं बुलढाणा जिल्ह्यात जिगाव प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळावा यासाठी विनोद पवार या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने जलसमाधी घेतली. ही घटना केवळ दुःखद नाही तर राजकारण्यांसाठी अत्यंत लज्जास्पद आणि संतापजनक आहे. आढोळ खु. पुनर्वसन नवीन गावठाण रस्त्याची गेल्या पाच वर्षांपासून शेतकऱ्यांची मागणी होती, परंतु प्रशासनाने दिरंगाई केली. जिल्हाधिकाऱ्यांनी भ्रष्ट टोळीत सामिल न होता तत्काळ जिगाव प्रकल्पातील संबंधित सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी आणि पवार कुटुंबातील कर्तापुरुष गेल्याने या कुटुंबाला मदत करावी.

# पाच दिवस अतिवृष्टीचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

महाराष्ट्रच नाही तर देशभरातच पावसाचा जोर वाढला आहे. भारतीय हवामान खात्याने महाराष्ट्रासह देशातील विविध भागांमध्ये आजपासून पुढील पाच दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे आणि त्यामुळे देशभरातच मोसमी पाऊस पुन्हा सक्रीय झाल्याचे पहायला मिळते आहे.

भारतीय हवामान खात्याने महाराष्ट्रासह उत्तराखंड, उत्तर प्रदेश, हरियाणा, जम्मू काश्मीर, राजस्थान, मेघालय या राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. भारतीय हवामान खात्याकडून शनिवारी महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात तब्बल दोन आठवडे दडी मारून बसलेल्या पावसाचा गेल्या काही दिवसांपासून जोर वाढला आहे. शनिवारी देखील राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. भारतीय हवामान खात्याने शनिवारी राज्यातील अनेक भागात हाय अलर्ट दिला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये शनिवारपासून पुढील चार ते पाच दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# अमरावती जिल्हा बँकेवर सायबर हल्ल्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १६ :

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दोन शाखांमध्ये सायबर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी तातडीची बैठक बोलावून यासंदर्भात सायबर हल्ला रोखण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्हा बँकेत सायबर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची वार्ता पसरल्यानंतर खातेधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. या सायबर हल्ल्यात बँकेच्या बडनेरा आणि मंगरूळ दस्तगीर येथील शाखांना लक्ष्य करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती प्राप्त झाल्यानंतर बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शनिवारी बँकेच्या संचालक मंडळाची आपत्कालीन बैठक बोलावली. बँकेतील विरोधी आघाडीतील अकरा संचालकांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आज पत्र लिहून बैठकीतील मतांची प्रोसिडिंगमध्ये नोंद घेण्याची विनंती केली.

बँकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि खातेदारांच्या रकमेला हानी पोहचून बँक अडचणीत येऊ नये, यासाठी अतिशीघ्र निर्णय घ्यावा. बँकेचा डेटा प्रभावित होऊन बँकेची आर्थिक हानी होऊ नये, यासाठी आमची सहमती आहे, असे सांगताना या विरोधक संचालकांनी काही प्रश्न उपस्थित केले.

त्यात बँकेमध्ये सायबर धोरण केव्हा अस्तित्वात आले, सॉफ्टवेअर घेण्यात आले, तेव्हा ही बाब कंपनीने लक्षात आणून दिली नाही का, आजपर्यंत उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत.

बँकेच्या आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठका का घेण्यात आल्या नाहीत, वैध संगणक समिती नियुक्त का केली नाही, डेटा केंद्र तयार करताना संरक्षणात्मक उपाययोजना का केली नाही, असे प्रश्न संचालक खासदार बळवंत वानखडे, बबलू देशमुख, वीरेंद्र जगताप, सुधाकर भारसाकळे, सुरेश साबळे, हरीभाऊ मोहोड, दयाराम काळे, श्रीकांत गावंडे, बाळासाहेब अलोणे, रवींद्र गायगोले, मोनिका वानखडे (मार्डीकर) यांनी उपस्थित केले आहेत.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते

## सावनेर शहरातील सीसीटीव्ही निगराणी प्रकल्पाचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सावनेर शहरातील सीसीटीव्ही निगराणी प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. सावनेर शहरातील एकूण २३ ठिकाणी ९१ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.

यावेळी खासदार शामकुमार बर्वे, आमदार आशिष देशमुख, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

जिल्हात सर्वप्रथम सावनेर या शहरात सीसीटीव्हीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व नगरपालिका क्षेत्रात येत्या काळात सीसीटीव्ही लावण्याचा मनोदय आहे. सीसीटीव्ही निगराणीखाली परिसर असल्यास नागरिकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, असे यावेळी पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी केले. खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार आशिष देशमुख यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार अपर पोलीस अधीक्षक नरेश मस्के यांनी मानले.

# श्री. रामदेव जीवनलीलाचे जिवंत नाट्यप्रस्तुतीचे भव्य आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. १६ :

श्री.रामदेव बाबा हे "रामसापीर" म्हणूनही ओळखले जातात. राजस्थानमधील एक प्रसिद्ध लोकदैवत असून, ते भगवान कृष्णाचे रूप मानले जातात, आणि त्यांनी अनेक चमत्कार केल्याचे सांगितले जाते. त्यांची समाधी राजस्थान मधील रामदेवरा येथे स्थित आहे. स्थानिक बुलडाणा येथे रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता सहकार विद्या मंदिर येथील सांस्कृतिक भवनमधे रामदेव बाबा यांच्या संपूर्ण जीवनाशी निगडित जिवंत नाट्यप्रस्तुती सादर केली जाणार आहे.



या कार्यक्रमात अकोला येथील सुनील नावंदर आणि सोबत 125 कलाकारांचा समूह ही नाट्यप्रस्तुती सादर करणार आहे. हा कार्यक्रम बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांच्या प्रेरणादायी संकल्पनेतून संपन्न होणार असून यासाठी बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर व सहकार विद्या मंदिर च्या अध्यक्षा कोमल झंवर यांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले आहे.


या कार्यक्रमा दरम्यान जमा झालेली दानराशी ही गौरक्षण येथे गौ सेवेसाठी सुपूर्द केली जाणार असून समस्त बुलडाणा वासियांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन बुलडाणा शहर सकल राजस्थानी समाज व बुलडाणा जिल्हा माहेश्वरी युवा संघटन द्वारे करण्यात आलेले आहे.

# पुरात वाहून गेला शेतकरी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १६ :

रिसोड तालुक्यातील एक शेतकरी पुराच्या पाण्यात वाहून गेले. शोध मोहिमेनंतर आज त्यांचा मृतदेह आढळून आला आहे. जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. रिसोड तालुक्यात गेल्या २४ तासांत ६२.३ मि.मी. पावसाची नोंद झाली. वाशीममध्ये ३८, तर मालेगाव तालुक्यात २७.९ मि.मी. पाऊस झाला आहे.

दरम्यान, पिराजी किसन गवळी (वय ६९, रा. मौजे वाडी रायताळ, ता. रिसोड, जि. वाशीम) हे नेहमीप्रमाणे शेतातील कामासाठी १५ ऑगस्टला गेले होते. स्थानिक नदीला अचानक आलेल्या पुराच्या जोरदार प्रवाहाबरोबर ते वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने तातडीने शोधकार्य सुरू केले होते.



**नागपूर :** दैनिक महासागर कार्यालयातील कर्मचारी नत्थुसिंग पटले यांच्या निवासस्थानी श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त शुक्रवारी भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली होती.

# नितीन गडकरींच्या उपस्थितीत वंदे मातरम वर्ल्ड रेकॉर्ड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल नागपूर जिल्ह्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या सामूहीक वंदे मातरम गायनाचे आयोजन करण्यात आले होते. नागपूरच्या सक्करदरा येथील कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सहभागी झाले. नागपूरमध्ये एकाचवेळी तीस हजार विद्यार्थ्यांनी वंदे मातरम गाऊन वर्ल्ड रेकॉर्ड केला. हा रेकॉर्ड आता गिनीज बुकमध्ये नोंदवला गेला आहे.

भारत मातेला वंदन करणारे राष्ट्रीय गीत वंदे मातरम १५० वर्षांपूर्वी कार्तिक शुद्ध नवमीला लिहिले गेले. ही तिथी कुष्माण्डा नवमी या नावेही ओळखली जाते. या तिथीला देवीने जसा कुष्मांडा नावाच्या राक्षसाचा वध केला आणि देवतांना अभय दिले, त्याचप्रमाणे आपली भारत भूमी ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाली म्हणून तत्कालीन प्रख्यात कादंबरीकार आणि कवी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी हे राष्ट्रीय गीत लिहिले. बालपणापासून



आपण त्याचे एकच कडवे म्हणत आलो आहोत. मात्र चॅटर्जी यांनी त्याच काव्यात मातृभूमीच्या स्तुतीपर आणखी चार कडवी लिहिली आहेत.

वंदे मातरम ही १८७० मध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी उच्च संस्कृतमय बंगाली भाषेत लिहिलेली एक कविता आहे. त्यांनी ही कविता त्यांच्या १८८२ च्या आनंदमठ या बंगाली कादंबरीत समाविष्ट केली होती. ही कविता सर्वप्रथम रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात गायली होती. हे गीत १९८२ मध्ये त्यांच्या आनंदमठ नावाच्या कादंबरीत प्रकाशित झाले. हे गीत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात खूप महत्वाचे ठरले आणि आजही देशभक्तीचे प्रतीक मानले जाते.

हे गीत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात खूप महत्वाचे होते आणि आजही देशभक्तीचे

## गिनीज बुकमध्ये नोंद

प्रतीक म्हणून ओळखले जाते, असे काही जण म्हणतात. हे गीत अनेक लोकांनी गायले आहे, ज्यात सुधीर फडके, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, विष्णुपंत पागनीस, केशवराव भोळे, ओंकारनाथ ठाकूर आणि इतर अनेक कलाकारांचा समावेश आहे. वंदे मातरम् हे महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे भारतातील लोकांमध्ये देशभक्ती आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण झाली. हे आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे आणि भारताला एक स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र बनवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करून देते.हे गाणे आपल्याला आपल्या मातृभूमीचे रक्षण आणि रक्षण करण्याच्या आपल्या कर्तव्याची आठवण करून देते. म्हणून, या प्रजासत्ताक दिनी, भारतातील प्रत्येक नागरिक भारताचे राष्ट्रीय गीत - वंदे मातरम गाऊन आपल्या मातृभूमीचे स्मरण करतो आणि त्यांचा सन्मान करतो.

# महावितरणकडून विद्युत सहायकांची परिमंडल निहाय निवड यादी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १६ :

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची व संबंधित परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात येणार आहे. या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर नमूद परिमंडल कार्यालयांमध्ये मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे तसेच अद्ययावत ओळखपत्राच्या मूळ प्रतीसह स्वतः हजर राहणे अनिवार्य आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक या पदासाठी दि. २० ते २२ मे दरम्यान

## कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला

ऑनलाइन क्षमता चाचणी घेतली होती. यात निवड झालेल्या उमेदवारांची यादी दि. ३० जुलैला सविस्तर माहिती व सूचनेसह कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर दि. १४ ऑगस्टला निवड यादीतील उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

आता येत्या दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. या तीनही दिवशी संबंधित परिमंडलांमध्ये सकाळी १० वाजता मूळ कागदपत्रांची पडताळणी सुरू होईल. नमूद दिवशी काही कारणास्तव पडताळणी पूर्ण झाली नाहीतर दुसऱ्या दिवशी करण्यात येईल. तथापि, सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह संबंधित उमेदवारांनी स्वतः हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्या कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विद्युत सहायक पदी निवड झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडलामध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल.